**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २९**

**सभावृत्तांत**

दिनांक – १९.०४.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल २०१४ ची मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९.०४.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.सायकर अजय शंकरराव
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२४. मा.आर.एस.कुमार
२५. मा.जावेद रमजान शेख
२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२७. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२८. मा.नंदा विकास ताकवणे
२९. मा.नेटके सुमन राजेंद्र
३०. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३१. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३३. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३४. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३५. मा.लोंढे गणेश नारायण
३६. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३७. मा.अपर्णा निलेश डोके
३८. मा.अनंत सुभाष को-हाळे
३९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४०. मा.पवार मनीषा काळूराम
४१. मा.प्रसाद शेट्टी
४२. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४४. मा.शेख अस्लम शौकत
४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४६. मा.वाबळे संजय मल्हारराव
४७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४८. मा.सुपे आशा रविंद्र
४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५०. मा.गोफणे अनुराधा देविदास
५१. मा.महेशदादा किसन लांडगे
५२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५३. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५४. मा.लोंढे शुभांगी संतोष
५५. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५६. मा.सावळे सिमा रविंद्र
५७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५८. मा.पालांडे सुजाता सुनिल
५९. मा.बहल योगेश मंगलसेन
६०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६१. मा.कदम सदगुरु महादेव
६२. मा.गिता सुशिल मंचरकर
६३. मा.कैलास महादेव कदम
६४. मा.छाया जगन्नाथ साबळे

६५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
६६. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
६७. मा.आसवाणी सविता धनराज
६८. मा.वाघेरे सुनिता राजेश
६९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७१. मा.काळे विमल रमेश
७२. मा.पाडाळे निता विलास
७३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७५. मा.विमलताई सुरेश जगताप
७६. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७७. मा.बारणे निलेश हिरामण
७८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७९. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८०. मा.बारणे माया संतोष
८१. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८२. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८३. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८४. मा.कलाटे स्वाती मयुर
८५. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८६. मा.चौंधे आरती सुरेश
८७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८९. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९२. मा.जगताप राजेंद्र गणपत
९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४. मा.जगताप नवनाथ दत्तु
९५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९७. मा.प्रशांत शितोळे
९८. मा.ओव्हाळ रमा नितिन उर्फ सनी
९९. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१००. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०५. मा.संजय केशवराव काटे
१०६. मा.पाटील सुजित वसंत
१०७. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.झुरे-सह आयुक्त, मा.टेकाळे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.भोसले- मुख्यलेखापाल, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.केदारी - कार्य.अभियंता, मा.कांबळे- प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पवार - कायदा सल्लागार, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**(**सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर- मोहीनीताई लांडे सभागृहात उपस्थित नसल्याने मा.उपमहापौर- राजू मिसाळ यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

**मा.उपमहापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-------------

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृहाला विनंती करतो, माऊंट एव्हरेस्ट हिमकडा कोसळून अपघाती मृत्यू पावलेले १२ नेपाळी शेर्पा तसेच गॅब्रिएल गार्सिया मार्क्वेझ – नोबल पुरस्कार विजेते जनप्रसिद्ध स्पॅनिश लेखक, के.एल.बजाज – मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व सिटू या कामगार संघटनेचे अखिल भारतीय उपाध्यक्ष कॉम्रेड, संगिता कांबळे – सामाजिक कार्यकर्ते उत्तम कांबळे यांच्या पत्नी, नामदेव काळे – सामाजिक कार्यकर्ते, हरिश्चंद्र लक्ष्मण मंचरकर – नगरसेविका मा.गिता सुशील मंचरकर यांचे सासरे यांना श्रध्दांजली अर्पण करुन सभा तहकूब करावी अशी विनंती करतो.

**मा.निलेश पांढारकर -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.उपमहापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------------

**मा.उपमहापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दिनांक ०९/०६/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(राजू मिसाळ)
उपमहापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २९**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९/४/२०१४ ची तहकूब सभा)**

दिनांक – ०९.०६.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे एप्रिल २०१४ ची) दि.१९/४/२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.०९.०६.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१६. मा.उल्हास शेट्टी
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१८. मा.पवार संगीता शाम
१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२१. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२२. मा.भारती फरांदे
२३. मा.आर.एस.कुमार
२४. मा.जावेद रमजान शेख
२५. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२६. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२७. मा.नंदा विकास ताकवणे
२८. मा.नेटके सुमन राजेंद्र
२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३४. मा.लोंढे गणेश नारायण
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३७. मा.अपर्णा निलेश डोके
३८. मा.अनंत सुभाष को-हाळे
३९. मा.पवार मनीषा काळूराम
४०. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४१. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४२. मा.शेख अस्लम शौकत
४३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४५. मा.मडिगेरी वर्षा विलास
४६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४७. मा.सुपे आशा रविंद्र
४८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४९. मा.गोफणे अनुराधा देविदास
५०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५१. मा.महेशदादा किसन लांडगे
५२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५३. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५४. मा.लोंढे शुभांगी संतोष
५५. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५६. मा.सावळे सिमा रविंद्र
५७. मा.पालांडे सुजाता सुनिल
५८. मा.कदम सदगुरु महादेव
५९. मा.गिता सुशिल मंचरकर
६०. मा.कैलास महादेव कदम
६१. मा.छाया जगन्नाथ साबळे

६२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
६३. मा.आसवानी सविता धनराज
६४. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
६५. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
६७. मा.काळे विमल रमेश
६८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
६९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७०. मा.विमलताई सुरेश जगताप
७१. मा.बारणे निलेश हिरामण
७२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
७४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
७५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७६. मा.कलाटे स्वाती मयुर
७७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
७८. मा.चौंधे आरती सुरेश
७९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८०. मा.बोकड रामदास गेणभाऊ
८१. मा.जवळकर वैशाली राहुल
८२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
८३. मा.जगताप राजेंद्र गणपत
८४. मा.शितोळे शैलजा बाबुराव
८५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८६. मा.प्रशांत शितोळे
८७. मा.संध्या सुरदास गायकवाड
८८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
८९. मा.शेंडगे आशा सुखदेव
९०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९१. मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील - सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.तांबे, मा.दांगट - कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.पवार- कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-------------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृहाला विनंती करते, मा.आनंद मोडक - ज्येष्ठ प्रयोगशील संगीतकार, मा.माधव मंत्री - ज्येष्ठ क्रिकेटपटटू यांना श्रध्दांजली अर्पण करुन सभा तहकूब करावी अशी विनंती करते.

**मा. सुरेखा साळुंके -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------------

**मा.दत्ता साने -** मा.महापौर साहेब आचारसंहितेबाबत सांगावे?

**मा.नगरसचिव -** जिल्हाधिकारी कार्यालय पुणे महसूल शाखा, आचारसंहिता विभाग यांचे दिनांक २/६/२०१४ च्या पत्रानुसार मार्गदर्शन प्राप्त झाले आहे त्यामध्ये असे नमुद केले आहे की, राज्यातील शिक्षक व पदवीधर विधानपरिषद निवडणूक कार्यक्रमास अनुसरुन लागू झालेल्या आचारसंहिता कालावधीत विकास कामे करावी किवा कसे? याबाबत मार्गदर्शन केले आहे. मा.भारत सरकार आयोग यांचेकडील पत्र क्रमांक ३२२ **/ MT LC/** २०१४ **(G&T) CC & BE** दिनांक २०/५/२०१४ मधील परि क्र. 2(1) (c) व V) मध्ये नमूद केलेप्रमाणे शिक्षक व पदवीधर मतदार यांचेवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव पडेल, अशी धोरणे ठरविता येणार नाही असे स्पष्टपणे नमूद केले आहे. सबब सदर मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने शिक्षक व पदवीधर मतदारांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पडेल अशी कामे सोडून इतर विकास कामे करता येतील. असे इकडील मत आहे. सबब त्यामधील मागदर्शक सुचनांचे व निर्देशांचे अनुषंगाने कार्यवाही करावी तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर, मा.आयुक्त मा.सभागृह केंद्रीय ग्रामविकास मंत्री आदरणीय गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन झाले. या सभागृहामध्ये त्यांना श्रध्दांजली वाहिलेली आहे. याठिकाणी श्रध्दांजलीपर त्यांचे मनोगत व्यक्त करीत आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खंबीर नेतृत्व असणारे गोपीनाथ मुंडे आकस्मिक निधन झालेमुळे दुखाची एक झळ महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली आहे या महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भाग असेल , शहरी भाग असेल या महाराष्ट्रातील तमाम मागासवर्गीय समाज असेल, शेतकरी असेल या सगळयांचे प्रश्न सातत्याने मंत्रीमंडळामध्ये संसदेत मांडणारे आदरणीय गोपीनाथ मुंडे यांचे जाण्याने फार मोठे नुकसान झालेले आहे. ज्या दिवशी ही घटना ऐकली ज्या दिवशी ते पाहिले त्या दिवशी प्रत्येकाच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला की, आता कुठे तरी चांगले दिवस या संपूर्ण महाराष्ट्राला निर्माण झाले होते. परंतु मुंडे साहेबांचे अपघाती निधन झाले आणि या निधनामुळे

हे सगळे प्रश्न अनुत्तरीत राहिले त्यामुळे आजचे प्रसंगी संपूर्ण महाराष्ट्रातील हे झुंजार नेतृत्व, संघर्ष करणारे नेतृत्व आदरणीय गोपीनाथ मुंडे यांना पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांचे वतीने श्रध्दांजली आणि आदरांजली वाहते.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर, मा.आयुक्त संपूर्ण महाराष्ट्राला हादरा देणारी, सर्वसामान्यांचा नेता, गरिबांचा नेता अचानकपणे गेल्याने महाराष्ट्राचे राजकारणात नाही तर देशाचे राजकारणाला कलाटणी मिळाली आहे. दिल्लीमध्ये त्या मराठी माणसाचे वजन होते. विलासराव देशमुख यांचे रुपामधून महाराष्ट्राच्या अस्तित्वाला धक्का बसला ती पोकळी भरुन काढता काढता आणि महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री म्हणून त्या ठिकाणी नियुक्ती झाली व आशेचा किरण संपूर्ण महाराष्ट्राला त्या ठिकाणी दिसला. त्यांचा महाराष्ट्रात दबदबा होता. महाराष्ट्राचा आवाज कुठेतरी दिल्लीमध्ये निर्माण झाला. महाराष्ट्राच्या अस्मितेला त्या ठिकाणी धक्का बसला. मुंडे साहेबांचे जीवन चरित्र जर पाहिले तर गरीब कुटूंबातून जन्माला आले. त्या काळातील संस्थानिक कुटूंबानी राजकीय सत्ता हाती ठेवली अशा संस्थानिकांची प्रस्थापितांची सत्ता असताना गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष करीत करीत गोरगरीबांचे दुख जाणून महाराष्ट्राचे राजकारण करीत दिल्लीच्या राजकारणामध्ये आपले अस्तित्व दाखवून दिले. खरतर ते भारताचे अस्तित्व होते. म्हणून त्यांचे फार मोठे दुख गोरगरीबांना, सामान्य जनतेला झालेले आहे. स्वत:च्या कर्तत्वावर मोठा झालेला माणूस उद्याच्या महाराष्ट्रातील गोरगरीबांसाठी, शेतकरी, कामगारांसाठी न्याय देणारा नेता आज महाराष्ट्रात उरलेला नाही. ग्रामीण भागात लोकांना आपला माणूस म्हणून त्यांचेमध्ये दिसायचे ही भावना लोकांमध्ये निर्माण व्हायची. परंतू आता या ठिकाणी निराशा झालेली आहे. पुन्हा एकदा चेहरा पाहावयास मिळणार नाही. आदरणीय गोपीनाथ मुंडे यांचे बाबतीत एक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील उसतोड कामगारांनी संप पुकारला होता. त्यांचा प्रश्न कोणीही हाती घेत नव्हते. त्यावेळी त्यांनी ठामपणे भूमिका घेतली. तो कष्टकरी कामगार आहे. त्यांचे पोट त्यावर अवलंबून होते. त्यांच्या मागण्यांसाठी उसतोड कामगारांनी संप पुकारला होता. अशा परिस्थितीत आगळा वेगळा संघर्ष करणारे असे नेते गोपीनाथ मुंडे होते. खरतर त्यांचे निधनाने भाजपच नव्हे तर सर्व पक्षाला, नागरिकांना दुख झालेले आहे. प्रत्येकाने आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. कदाचित राजकीय पटलावर त्यांची पोकळी, जागा भरून निघेल, परंतू पुन्हा गोपीनाथ मुंडे याठिकाणी तयार होणार नाही. हे गरीब, सर्वसामान्य लोकांच्या व सर्वांच्या मनात कायम राहील. याठिकाणी माझ्या वतीने, शिवसेनेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली व्यक्त करतो.

**मा.महेशदादा लांडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह काही दिवसापुर्वी महाराष्ट्राला हळहळ करणारी संपूर्ण महाराष्ट्र दु:खाच्या छायेत आले आहे. माझे अगोदर त्यांचे भाषणात सांगितले. त्यांचे अपघाती निधनाने त्यांचे मतदारसंघात तसेच संपूर्ण महाराष्ट्रात फार दु:ख झाले आहे. संपूर्ण दिवसभर त्यांचे बाबतीत टी.व्ही.वर पाहायला मिळत होते. संपूर्ण महाराष्ट्रात तडफदार व्यक्ती म्हणून मुंडे साहेब आम्हाला पाहायला मिळत होते. तरुण कार्यकर्त्यांना राजकीय जीवनामध्ये प्रभाव पाडणारे व्यक्तीमत्व आम्हाला पाहायला मिळाले. आयबीएन लोकमतला २००९ साली निखील वाबळे सर यांनी त्यांची मुलाखत घेतली. एक संघर्षाचा अंत अशी ती हेडलाईन होती. गोपीनाथ मुंडे यांनी त्यांचे शालेय जीवनाबाबत

आतापर्यंत सांगितले की, त्यांनी अतिशय संघर्ष केला होता. त्या संदर्भात निखील वाबळे सर यांनी मुंडे साहेबांची मुलाखत घेतली होती. आजपर्यंत पंडीत जवाहरलाल नेहरु, लालबहादूर शास्त्री यांना शिक्षणाबाबत करावा लागलेला संघर्ष या बाबतीत वाचण्यात आले आहे. त्याचबरोबर मुंडे साहेबांनी केलेला शिक्षणासाठी संघर्ष, मुंडे साहेब आठ कि.मी.शिक्षणासाठी चालत असत. त्यांचे हायस्कुल, माध्यमिक, विद्यालयाचे, कॉलेजचे जीवनातील शिक्षणाबद्दल त्यांनी मुलाखतीत सांगितले. काही माणासांच्या नशिबाला आयुष्यामध्ये काहीही आपोआप मिळत नाही. त्यांनी लहानपणापासून संघर्ष करुन आजपर्यंत राजकीय वाटचाल केली. संघर्ष हा नेहमी अशा व्यक्तींच्या जीवनात येत असतो की, त्यांचे जीवन हे सर्व समाजासाठी असते. अशा प्रकारे संघर्ष करणारे हे महाराष्ट्रातील तळागाळातील जनतेपर्यंत जात असतात. हे गोपीनाथ मुंडे यांचे मुलाखतीत आले आहे. बहुजन समाजासाठी लढणारे नेते त्यांची दिल्लीमध्ये ख्याती होती. तडफदार नेते या महाराष्ट्राने गमावले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पोकळी निर्माण झालेली आहे. आदरणीय विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे साहेब असे हे बहुजन समाजाचे दृष्टीने निर्णय घेणारे चांगले नेते आज महाराष्ट्राने गमावले आहे. ज्यांचे जाण्याने भाजपलाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेवर शोककळा पसरली आहे. मी माझे वैयक्तिक लांडगे कुटूंबाच्या वतीने, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह ३ जून रोजी हे नेते जिवंत होते, आणि आता गेले अशी घटना घडणे ही देशातील पहिली घटना आहे. त्या दिवशी गोपीनाथ मुंडे यांचे निधन झाले खरतर काल परवा शपथविधी घेतलेले ग्राम विकास मंत्री त्यांनी प्रत्येक खेडयापाडयात रस्ते करणे, पाणीपुरवठा करणार, ड्रेनेज सारख्या एक ना अनेक स्वरुपाची कामे या महाराष्ट्रासाठी, देशासाठी, समाजासाठी करीत असताना काळाने झडप घातली. कळत नाही, महाराष्ट्राला शाप आहे की काय, जो नेता चांगल्या मार्गाने जातो त्यांचे बाबतीत असे हे अनपेक्षित होत असते. प्रमोद महाजन सारखे, बाळासाहेब ठाकरे आणि आता गोपीनाथ मुंडे. महाराष्ट्र आता कुठे दिल्लीमध्ये उभा राहायला पाहत होता, प्रयत्नही करीत होते आणि त्याच वेळेस सर्वात चांगले मोठे नेते असणारे गोपीनाथ मुंडे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. खरतर संघर्षातून कार्यकर्ता होतो व पुढे नेता होतो. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे अस्तित्व होते. आपण कधी खचून जायचे नाही, तर आपण ताठ मानाने उभे राहायचे असा हा नेता. धुरंदर नेता बहुजनाचा नेता. त्या दिवशी मी त्यांचे अंत्यविधीला गेले होते. त्याभागातील मुस्लिम बांधव प्रत्येकांना प्रत्येक गाडीमध्ये काहीही भेदभाव न करता पाण्याच्या पिशव्या देत होते. त्याठिकाणी वेगवेगळया समाजाच्या लोकांनी अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. काही लोकांना त्यांचे जाणे हे अजिबात रुचलेले नाही. सर्वांना संताप होत होता. परंतू आफत आली आहे सर्वांवर. माझे वतीने माझे कुटुंबियांचे वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहते.

**मा.राहूल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा. नगरसचिव, सन्मा.सभागृह बीड जिल्हयाचे नेतृत्व करणारे आणि संपूर्ण महाराष्ट्राला त्यांचे जाण्याने हळहळ व्यक्त करावी लागते. असे देशाचे ग्रामविकास मंत्री गोपीनाथ मुंडे साहेब यांचे दुखद निधन झाले. त्यांचे निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्राला दुखाची झळ पसरलेली आहे. बीड जिल्हयात माझे जाणे होत असते. माझे मतदार मित्र त्याठिकाणी आहेत त्यांची भेट घेण्यासाठी मी जात असतो. तेव्ही मी प्रत्येक

घरामध्ये पाहिले तेथील गोरगरीब देवाचे फोटो जसे भिंतीवर लावतात तसे मुंडे साहेबांचे फोटो घराच्या भिंतीवर लावतात. मी ज्या ज्या वेळेस तेथे गेलो त्यावेळेस प्रत्येकाच्या तोंडात गोपानाथ मुंडे यांचे नाव होते. असा हा नेता गोरगरीबासाठी धावून येणार. माझी चारपाच वेळा त्यांचेबरोबर भेट झाली. गोरगरीब जनतेला चांगला न्याय दिल्यामुळे आपले दुख व्यक्त करीत होते. प्रत्येकजण रडत होते. आपले दुख व्यक्त करीत होते. संपूर्ण महाराष्ट्राला दुख झाले. महाराष्ट्राला दुखाची झळ पसरली आहे. महाराष्ट्रामध्ये खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यांचे जाण्याने महाराष्ट्रातील सर्व जनतेला जे दुख झाले ते दुख सहन करण्याची शक्ती मिळो. अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. माझ्या पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तसेच चिखली ग्रामस्थांच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, नगरसचिव, तीन जून स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन झाले आणि महाराष्ट्राला काळा दिवस अनुभवायला मिळाला. राजकारणात काही कार्यकर्ते असतात. तसेच काही आदर्श कार्यकर्ते असतात. आणि या आदर्श व्यक्तीमत्व असते आणि या आदर्श व्यक्तीमत्वामध्ये गोपीनाथ मुंडे होते. त्यांचे कार्याचा अनुभव घेऊन नवीन कार्यकर्ते होत असत. मा.गोपीनाथ मुंडे त्यांना ग्रामविकास मंत्री म्हणून सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये जे स्थान निर्माण केले होते, ते खूप कमी नेत्याने लाभते. जेव्हा त्यांचे अंत्यविधी संस्कार टी.व्ही.वर पाहत होतो त्यावेळेस खूप कार्यकर्ते तळमळीने रडत होते. त्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. निश्चितपणे त्यांचे निधनामुळे महाराष्ट्रातील सर्व जनतेला दुख झाले आहे. हे दुख सावरण्याची शक्ती त्यांना देवो. अशी मी प्रार्थना करतो. मी माझ्या वतीने व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

**मा.सुलभाताई उबाळे** - केंद्रीय ग्रामविकासमंत्री आदरणीय कै.गोपीनाथ मुंडे यांचे मृत्युची बातमी ऐकली सर्व ठिकाणी झळकली त्यावेळी प्रत्येक कार्यकर्त्यांचा, जनसामान्यांचा ह्दयाचा ठोका चुकला. काही व्यक्ती अशा असतात त्यांना पदामुळे शोभा येते, पण काही व्यक्ती अशा असतात की त्यांचेमुळे पदाला शोभा येते. त्यांचेपैकी गोपीनाथ मुंडे होते. आज सगळयांनी सांगितले बहुजनांचा नेता, मराठवाडयाचे खंबीर नेतृत्व, महाराष्ट्राचे शिल्पकार, यांचे जाण्याने भारतीय जनता पार्टी व शिवसेनेचे नुकसान झाले. राजकारणात काही गोष्टीमुळे अंतर्गत तात्वीक मतभेद होते, पण त्यावेळेस गोपीनाथ मुंडे ढालीसारखे राहिले. समन्वय साधण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. प्रमोद महाजन हे त्यांचे मेव्हणे ते गेले योगायोगाने त्यांची तीन जून तारीख होती. त्यावेळी गोपीनाथ मुंडे निराश झाले होते. परंतू असे सांगितले होते, त्यांनी विद्यार्थी संघटनेपासून राजकारणात प्रवेश केला. पुढे ते त्यांचे मेव्हणे झाले. फक्त प्रमोद महाजन यांचे मार्गदर्शन मिळून झाले. त्यानंतर त्यांचे नाव फुलत गेले. आज गोपीनाथ मुंडे सारखे कार्यकर्ते होते. मुंडे साहेब स्वताच्या मतदारसंघात दोन दिवस सुध्दा स्वस्थ थांबत नव्हते. संपूर्ण महाराष्ट्रात ते सभा घेत होते. त्यांनी जीवाची पर्वा कधी केली नाही. माझे सगळे मित्र निवडून आले पाहिजे. माझे सर्व सवंगडी निवडून आले पाहिजे. मी त्यांचेबद्दलचा एक प्रसंग सांगते. मा.आढळराव पाटील पुण्यात येणार होते. भोसरीमध्ये एक सभा रात्रीच्या १०.०० वाजता होती. १०.०० वाजल्यानंतर आचारसंहितेच्या नियमाप्रमाणे परवानगी नव्हती. परंतू भोसरीमध्ये

उपस्थित जनसमुदाय होता. त्या जनसमुदाया बरोबर मोबाईलवरुन, स्पीकरवरुन त्यांनी जनसंपर्क केला. त्यांनी सांगितले, मी वेळेवर येऊ शकत नाही, परंतू माझी वाट बघा मी त्या ठिकाणी १५ ते २० मिनिटासाठी येईल. आपण जावू नये. असे सांगून त्यांनी आवाहान केले. त्यांनी भाषणास सुरुवात केली आणि टाळयांचा कडकडाट केला. एकीकडे काही कार्यकर्त्यांना पैसे देऊन सभेला माणसे बोलवायला लागायची. दुसरीकडे गोपीनाथ मुंडे अर्धातास उशिरा येऊन देखील माणसे हललेली नाही. एक नितांत प्रेम होते. हे आम्ही स्वत: अनुभवले. प्रत्यक्ष बघितले आहे. असा एक नेता आपल्यामधून निघून गेला आहे. काही लोकांचा जन्म हा पायाभरणीसाठी असतो. अशी पायाभरणी त्यांनी मजबूत केली आहे. आता कोणी जरी आले तरी त्याठिकाणी फरक पडणार नाही. त्यांची मुलगी पंकजा, खरतर अतोनात दु:ख तिला झालेले आहे. त्यांचे घरामध्ये गोपीनाथ मुंडे यांची मुलगी पंकजा मुलाप्रमाणे बाबांच्या पाठीमागे उभी राहीली. पुर्वी बाबांबरोबर ती स्वत: गेली होती. बाबांबरोबर पक्षाचे वतीने काम केले आहे. आज मी महापौरांना विनंती केली. आणि त्यांनी परवानगी दिली. कै.गोपीनाथ मुंडे यांचे मनोगत सभागृहात करायचे आहे, मी माझे वतीने शिवसेनेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली व्यक्त करते.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, ग्रामविकास मंत्री गोपीनाथ मुंडे यांचे दु:खद निधन झालेले आहे. नियतीचा खेळ कसा असतो. काय योगायोग आहे. मागच्या सभेत आपण महायुतीचा आनंदोत्सव साजरा केला आणि आता दुर्दैवाने श्रध्दांजलीची वेळ आली आहे. आणि ही वेळ येईल असे स्वप्नात सुध्दा वाटले नव्हते. संपूर्ण महाराष्ट्रात दु:ख झाले आहे. गोपीनाथ मुंडे यांचे बाबतीत बोलायचे झाले तर आताच त्यांचेकडून खूप मोठया अपेक्षा होत्या आणि त्यांनी ग्रामविकास मंत्री म्हणून एक दिवस सुध्दा काम केलेले नाही. ही खूप मोठी दु:खाची गोष्ट आहे. महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांना त्यांचेवर जेंव्हा खूप मोठे संकट येते, दुष्काळ पडतो त्या दुष्काळाचे दु:ख झाले नसेल एवढे त्यांचेसाठी दु:ख झाले आहे. दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. आता भाजपला सत्ता, महायुतीचे सरकार आले आणि त्यामुळे नियतीचा खेळ असेल हे सांगता येत नाही. त्यांचे आत्म्यास शांती लाभो एवढी प्रार्थना करते.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आज दिवंगत राजकीय नेते गोपीनाथ मुंडे यांनी शपथविधी ग्रहण करुन आताच पदभार स्विकारला आणि ही घटना घडली आणि गोपीनाथ मुंडे यांची श्रध्दांजलीसाठी आज आपण येथे आहोत. अनेक कार्यकर्त्यांची नेत्यांची जडणघडण होत असते. तसेच कार्यकर्ते व नगरसेवक होत असतात. मग ते त्यांचे नावारुपाने येणारे कार्यकर्ते असेल. राजकारणात खंबीर नेतृत्व करणारे, वाटचाल करणारे त्यांना पंधरा ते वीस वर्षे लागतात. परंतू राज्याच्या राजकारणात दखल घेण्याकरिता अविरत काम करण्यास चाळीस वर्षाचा कालखंड लागतो. चाळीस वर्षाचा बदल पाहिलेला आहे. मी स्वत: तीन वर्षे प्रत्यक्ष सातत्याने त्यांच्या काळात वर्तमानपत्राच्या माध्यमातून, मिडियाच्या माध्यमातून तीस वर्षे सातत्याने मी पाहात आहे. ही महाराष्ट्राची भूमी अनेक युगपुरुषांची आहे. काही ना काही सक्षम विचार आपल्यासाठी वाटचाल करण्यासाठी आपल्यासमोर ठेवले आहे. आणि ते आदणीय गोपीनाथ मुंडे यांनी ठेवले आहे. कारण मी पाहिले वारसाहक्काने मोठी

झालेली माणसे यांचे भविष्य शाश्वत नसते. विशिष्ट काही विचार घेवून कितीही सत्ता आली, कितीही अन्याय झाला आणि कितीही प्रसंग आले तरी आपले तत्वाशी तडजोड न करता यशाच्या उत्तुंग भरारी मारण्याचे, अध्यात्म जोपासण्याचे काम करतात. यशाच्या विकासासाठी उत्तुंग भरारी मारण्याकरीता गुणात्मक दर्जा लागतो तो गुणात्मक दर्जा जोपासून राजकारणात वेदना न होता सवंगडीची संख्या वाढवित वाढवित कार्यकर्त्यांच्या बाबतीत गोपीनाथ मुंडे यांचे नाव घेतल्याशिवाय इतिहास पुर्ण होणार नाही. एवढे उत्तुंग व्यक्तीमत्व आदणीय गोपीनाथ मुंडे यांचे होते. अनेक नेत्यांचा मला सहवास मिळाला. गोपीनाथ मुंडे यांचा २००१ पासून राजकारणाच्या दृष्टीकोनातून काही कार्यक्रमातून संबंध आला. विलासराव देशमुख माझे मित्र होते. कधी कधी तसेच दिवाळीच्या सणाला सतत नऊ वर्षे त्यांचेबरोबर होतो. त्याची काम करण्याची पध्दत पाहिली, त्यांच्या कामाचा जो आवाका होता तो पाहिला. त्यांची जीवनशैली पाहिली, ही माणसे झोपत कधी होती, आणि उठत कधी होती, आणि काम कधी करीत होती. विशेषत: भारतीय जनता पक्ष हा विशिष्ठ पक्षाचा चेहरा होता. विशिष्ठ लोकांचा हा पक्ष आहे. भारतीय जनता पक्षामध्ये बहूजनासाठी कार्य करत होते. गोपीनाथ मुंडे यांनी झोपडपट्टीतील लोकापासून तर कार, एसी मध्ये असणा-या लोकापर्यंत हा माझा पक्ष अशी भावना निर्माण केली. असे त्यांनी काम केले आहे. असा विश्वास त्यांनी निर्माण केला. त्या कार्यकर्त्याचे कौतूक करावेसे वाटते की, ३०,४० वर्षे राजकारणात राहून त्यांनी कधी पक्ष बदलला नाही. कारण गोपीनाथ मुंडे हे त्यांचेबरोबर तेथे होते. आजची परिस्थिती वेगळी आहे. आणि त्याच पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष काम होत आहे. कारण आपण पाहतो निवडणूकीमध्ये प्रचार करायचा दुस-याचा आणि निवडून आणायचे तिस-याला. असे संस्कार फोफावत होते. आणि अशा संस्काराला छेद देणारे व्यक्तीमत्व आदणीय गोपीनाथ मुंडे होते. आणि अशा या मोठया लोकांची नावे घेण्यासाठी आपली उंची असावी लागते. आणि आपल्याला माहिती करुन घ्यायचे असते खरतर गोपीनाथ मुंडे चाळीस वर्षापेक्षा जास्त राजकारणात सक्षम होते. विचाराने मोठी झालेल्या माणसांचा मी इतिहास जमा करीत असतो. व त्या इतिहासाचे अग्रगण्य पान म्हणजे गोपीनाथ मुंढे हे आदर्श होते. त्यांचेमध्ये विश्वास होता. आत्मविश्वास होता. आणि असे हे आदर्श व्यक्तीमत्व फक्त गोपीनाथ मुंडे होते. आता असा आदर्श कुणाचा ठेवावा ही शोकांतिका आहे. कारण इतिहासाची पाने उलगडली तर आदणीय यशवंतराव चव्हाण असतील, वसंतदादा पाटील असतील असे गोपीनाथ मुंडे होते. आणि त्यांचा मला सहवास लाभला. आम्ही निर्णय प्रक्रियेमध्ये होतो. मी जवळून पाहिले २४ तास ही लोक काम करायचे, इतका त्रास काढायचे की, गाडीतच खायचे, गाडीतच झोपायचे. आम्ही त्यावेळेस चकित झालो. कारण आम्ही समजत होतो की, आम्ही खूप काम करतो. - आर्थिक पद मिळण्यापेक्षा वैचारीक पद अनंतकाळ टिकणारे असते. आर्थिक व आर्थिकतेचे काहीही होत नाही. गोपीनाथ मुंडे यांचे बाबतीत आयुक्त साहेब मला एक सुचना करावीशी वाटते. इंग्लंड, लंडनमध्ये लोकांनी दारे उघडली तेंव्हा तिकडे दालनामध्ये मोठया व्यक्तींचे फोटो असतात. तेंव्हा आपलेकडे असे दालन करावे की, त्यामध्ये असे फोटो असावे व त्यांचा इतिहास असावा अशाप्रकारे दालन करावे. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये महाराष्ट्राला दिशा देणारी ग्यानबा, तुकाराम ही व्यक्ती आहेत. आज त्यांचे विचारच दिशा देण्याचे, काम करतात. नवीन पिढीला दिशा देण्याचे काम करतात. आणि काही विभागात अनेक प्रश्न आहेत. चांगला विचार करण्याचे काम त्यांनी केले. त्या पातळीवर

विचार करणारे युगपुरुष होऊन गेले. आपण आपल्या शहरामध्ये जे प्रकल्प राबवितो ते जनावरांसारखे आपण ठेवले आहे. आदरणीय गोपीनाथ मुंडे यांचे वैचारीक पातळी समजून घेण्यास सुरुवात केली होती. आणि त्या दृष्टीकोनातून आम्ही सभा घेण्याचे आम्हाला एक आकर्षण होते. नाटयगृहात एक सारखे कार्यक्रम घडवून आणत होतो. त्यावेळी त्यांची तीन पत्र आमचेकडे आहेत. मी स्वत: सांगत आहे. ते होते म्हणून नेते आहेत. तो अनंतकाळ टिकणारा विचार, चांगल्या गोष्टी त्यांचेमुळे घडल्या. आज त्यांच्या या सगळया गोष्टीची पूजा करुन आज हा आकर्षक नेता आहे. आज त्या लोकांनी त्यांचा विश्वास घेऊन सन्मान दिला. आज पंधरा खासदार पक्षात घेऊन ८९ खासदार देशासाठी त्यांनी ही दूरदृष्टी ठेवली. आपल्या देशात आदरणीय यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील होऊन गेले. सत्तेचे काम त्यांना कमी मिळाले. परमेश्वराने त्यांचेवर घाला घातला. या ठिकाणी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने तसेच माझे वतीने माझे कुटूंबाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

**मा.मंगलाताई कदम -** कै.गोपीनाथ मुंडे यांना माझा दंडवत आहे. असे म्हटले जाते जो आवडे सर्वांना तोची आवडे देवाला. तीन जून काळा दिवस म्हणून सगळयांनी म्हटले. त्यांचे मृत्यूची बातमी समजली, गोपीनाथ मुंडे आपल्यामध्ये नाहीत. प्रत्येक लोकांचा या बातमीवर विश्वासच बसत नव्हता. त्यांनी घेतलेला शपथविधी, नागरिकांची आजपर्यंत केलेली कामे, इतका मोठा आयुष्यात केलेला संघर्ष होता. आज खरतर चांगले कामे करण्यासाठी संधी मिळाली होती. अशी काही गंभीर घटना घडेल व येणारी ती वेळ होती ती कोणाला वाटत नव्हते. त्यावर कोणाचाच विश्वास बसत नव्हता. त्यामुळे ही अफवा असेल व तया अफवेची दुरुस्ती होईल. पण काही लोक असे होते त्यांनी आयुष्यामध्ये शेतक-यांसाठी, कष्टक-यांसाठी व अनेक कार्यकर्त्यांसाठी पिंपरी चिंचवड शहरासाठी, महाराष्ट्रातील लोकासाठी देशासाठी काम केले. पिंपरी चिंचवड शहरामध्ये भाजपचे कार्यकर्ते, नगरसेवक आहे. आजपर्यंत त्या नगरसवेकांनी, कार्यकर्त्यांनी त्यांचे पाठीमागे विकासाची वाटचाल केली होती. संघर्ष करण्याचे त्यांचे मनात विचार कधी आला नाही. म्हणून या पिंपरी चिंचवड शहरामध्ये चांगल्या पध्दतीने विकासाच्या दृष्टीने काम केलेले आहे. विरोधात कधीही काम केले नाही. ज्या ज्या कार्यक्रमाच्या माध्यमातून भेटण्याची वेळ आली त्यावेळी मा.उमा खापरे असतील, कांता मोंढे असतील यांची काम करण्याची पध्दत प्रत्यक्षात पाहिली. राजकारणात कामकाजाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरामध्ये असे कितीतरी अनेक कार्यकर्ते असतात, त्या सगळयांना बरोबर घेऊन जाण्याची शिकवण आदरणीय गोपीनाथ मुंडे यांनी सगळया कार्यकर्त्यांना दिली. काही लोक त्या चौकटीत बसू शकत नाही. राजकारणात बरेच नेते होऊन गेले. त्यातील काही त्या चौकटीत बसू शकतात. कारण येणारा काळच पुढे काही बोलत असतो असे म्हणतात. सर्व कार्यकर्त्यांना, नगरसेवकांना त्यांचे पावलावर पाऊल ठेवून काम करता येणार नाही. त्यांचेसारखे काम त्याच पध्दतीने सगळेच करु शकणार नाही. परंतू त्यांचेसारखे त्यांचे पदध्तीने काम केले तरच खरी श्रध्दांजली वाहिली असे होईल. मी माझ्यावतीने माझ्या कुटूंबियांचे वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहते.

**मा.महापौर -** आज आपण सर्व गोपीनाथ मुंडे यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी उपस्थित आहोत. तीन जून अजूनही अंगावर शहारे येतात. खरच ते आपल्यामधून गेले. अचानकपणे त्यांचे दु:खद निधन झाले यावर विश्वास बसत नाही. २६ तारखेला त्यांनी शपथ घेतली आणि आठ

दिवसात बातमी ऐकली. देशातील सर्वांना दु:ख झाले आहे. असे होते गोपीनाथ मुंडे. सर्वसामान्यांचे नेते, शेतक-यांचे नेते चांगल्या रितीने सर्व देशात काम करणारे आणि सर्वसामान्य जनतेसाठी होते. शहरामध्ये सर्व नागरिकांना कायम मदत करण्याचे काम केले आहे. गोपीनाथ मुंडे गेल्याने सर्वांना दु:ख झाले. त्यांचे कुटूंबियांना दु:ख सहन करण्याची ताकद मिळावी. माझे वतीने, माझे कुटूंबाच्या वतीने सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहते.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शनिवार दिनांक ५/७/२०१४ रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

--------

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २९**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९/४/२०१४ व ९/६/२०१४ ची तहकूब सभा)**

दिनांक – ५/०७/२०१४ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे एप्रिल २०१४ ची) दि.९/६/२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा शनीवार दि.०५.०७.२०१४ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७. मा.भारती फरांदे
२८. मा.आर.एस.कुमार
२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३१. मा.नंदा विकास ताकवणे
३२. मा.नेटके सुमन राजेंद्र
३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८. मा.अपर्णा निलेश डोके
३९. मा.अनंत सुभाष को-हाळे
४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१. मा.प्रसाद शेट्टी
४२. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४५. मा.शेख अस्लम शैकत
४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.वाबळे संजय मल्हारराव
४८. मा.मडिगेरी वर्षा विलास
४९. मा.सौ.गवळी सुनिता (ताई) पांडूरंग
५०. मा.सुपे आशा रविंद्र
५१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५२. मा.गोफणे अनुराधा देविदास
५३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५४. मा.महेशदादा किसन लांडगे
५५. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५६. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५७. मा.लोंढे शुभांगी संतोष
५८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५९. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६०. मा.सावळे सिमा रविंद्र
६१. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६२. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६३. मा.पालांडे सुजाता सुनिल
६४. मा.बहल योगेश मंगलसेन
६५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६६. मा.कदम सदगुरु महादेव
६७. मा.गिता सुशील मंचरकर
६८. मा.कैलास महादेव कदम
६९. मा.छाया जगन्नाथ साबळे
७०. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७१. मा.आसवानी सविता धनराज
७२. मा.वाघेरे सुनिता राजेश
७३. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७६. मा.काळे विमल रमेश
७७. मा.पाडाळे निता विलास
७८. मा.विनोद जयवंत नढे
७९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८०. मा.कैलास गबाजी थोपटे
८१. मा.विमलताई सुरेश जगताप
८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८३. मा.बारणे निलेश हिरामण
८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८५. मा.बारणे माया संतोष
८६. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८७. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८९. मा.कलाटे स्वाती मयुर
९०. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९१. मा.चौंधे आरती सुरेश
९२. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९३. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९४. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९५. मा.जवळकर वैशाली राहुल
९६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९७. मा.जगताप राजेंद्र गणपत
९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९९. मा.जगताप नवनाथ दत्तु

१००. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०१. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०२. मा.जम सोनाली पोपट
१०३. मा.प्रशांत शितोळे
१०४. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०५. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०७. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०८. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११०. मा.संजय केशवराव काटे
१११. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११३. मा.पाटील सुजित वसंत
११४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.झुरे-सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगूडे, मा.माछरे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे -विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.मनोज देशमुख-वैद्यकीय अधिक्षक, मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कांबळे, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.घोडे-कार्य.अभियंता,
मा.प्रविण अष्टीकर-पीएमपीएमएल, मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी (जनतासंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्र.२४ दि.२०.१२.२०१३, १०.०१.२०१४, १६.०१.२०१४ व १८.०१.२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४९२ विषय क्रमांक- १
दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.विमुका/जा/६०६/२०१४ दि.२०/०३/२०१४.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.६६३१ दिनांक २५/०३/२०१४

महसुली खर्च अंतर्गत वैद्यकिय विभागाकडील "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावरुन र.रु.८० लाखामधून विद्युत विभागाचे "स्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु.५ लाख, "स्ट्रीट लाईट बील" या लेखाशिर्षावर र.रु. ७४ लाख "जनरेटर इंधन" या लेखाशिर्षावर र.रु.५० हजार आणि "वाहन इंधन" या लेखाशिर्षावर र.रु.५० हजार याप्रमाणे वर्ग करणेकामीचे प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४९३ विषय क्रमांक- २
दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/२६३/२०१४ दि.२९/०३/२०१४.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.६६६९ दिनांक ०१/०४/२०१४

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांनी दिनांक २१/३/१४ चे पत्रान्वये शासन निर्णय क्र. एनयुआर- २०१३/प्रक.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १८/२/२०१४ चे पत्रात नमुद केलेनुसार महामंडळाची आर्थिक सद्यःस्थिती अत्यंत बिकट असल्याने सन २०१३-१४ च्या संभाव्य संचलन तूटी मधून (Operational losses) सदरची रक्कम समायोजीत करणेस अधिन राहून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांना र.रु.१३.५० (अक्षरी र.रु.तेरा कोटी पन्नास लाख) अदा करावयाचे असल्याने तसेच सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यास मान्यता देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.दत्ता साने-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी पीएमपीएमएलचे कोणी अधिकारी आलेले आहेत का नाहीत याची अगोदर खात्री करावी. नंतर मला बोलायचे आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला वाटते पीएमपीएमएलचे जोशी साहेबा ऐवजी प्रभारी अध्यक्ष म्हणून आपले आयुक्त साहेब आहेत. मा.आयुक्त साहेब एक महिना अध्यक्ष असतीलतर यावर चर्चा करण्यास काही हरकत नाही.

**मा.आयुक्त**- मा.महापौर मॅडम, मा.सभागृह माझ्या कडे २ तारखेपासून चार्ज आलेला आहे तो ३१ जुलैपर्यंत राहणार आहे. पीएमपीएमएलचे अधिकरी पाच मिनीटात येथे पोहचतात त्यामुळे चर्चा करण्यास हरकत नाही.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला आपल्याला विनंती करायची आहे की सगळयात पहिली पीएमपीएमएल संदर्भात माझी एक सूचना आहे की जे पीएमपीएमएलचे अधिकारी आहेत ते आपल्या पिंपरी चिंचवड मनपाच्या कर्मचा-यांना दुजाभावाची वागणूक देतात. आई वडील वेगळे असतात अशा पध्दतीने ते वागवतात. त्या ठिकाणी आपल्या कर्मचा-यांना कोठेही सन्मानाची वागणूक दिली जात नाही. त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही. त्यांचे मेडीकल बील असतील, त्यांच्या सुट्टया असतील त्यामध्ये अन्याय होतोय त्यांच्या पगारामध्ये अन्याय होतोय आणि पिंपरी चिंचवड माहनगरपालिका मात्र त्यांच्या बरोबरीने पीएमपीएमएलला वाटा देतेय. आपण यापुर्वी त्यांना पैसे दिलेले आहेत. असं असताना कर्मचा-यांवर अन्याय होतोय. कर्मचारी महासंघाचे आध्यक्ष बबनराव झिंजूर्डे यांनी कित्येक वेळा पत्रव्यहार केला, तक्रारी दिल्या परंतु त्यामध्ये काहीही सुधारणा झालेली नाही. आयुक्त साहेब, आपल्या काळामध्ये आपले ड्रायव्हर, कन्डक्टर, चेकर जे काही कर्मचारी आहेत त्यांच्या ज्या मागण्या आहेत त्या सुटल्यातर निश्चितपणे आमचा पिंपरी चिंचवडचा कर्मचारी पीएमपीएमएलमध्ये ताठ मानेने जगेल आणि त्यांची कॉलर देखील ताठ राहील. या गोष्टी मी आपल्या समोर ठेवलेल्या आहेत त्यावर आपण लवकरात लवकर विचार करावा आणि कर्मचा-याच्या बाबतीत आपण दखल घ्याल अशी अपेक्षा करुन थांबतो.

**मा.अरुण बो-हाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आताच बोकड साहेबांनी सांगीतलेले खरं आहे आपले जे कर्मचारी आहेत त्यांचे प्रॉब्लेम आहेत. मुळातच हे पीएमपीएमएल हे पीसीएमटी आणि पीएमटी या दोघांच विलीनीकरण करुन काढलेली एक कंपनी आहे. याच्यावर नेमका कंट्रोल कोणाचा आहे का नाही या विषयी शंका आहे. तुलनेने पुणे शहरापेक्षा पिंपरी चिंचवडच्या कोणत्याही रुटवर गाडयांच व्यवस्थीत नियोजन नाही. जर एखादी तक्रार करायची म्हणलेतर मी स्वत: पत्र दिलेली आहेत मध्यंतरी मा.महापौरानी संबंधीत अधिका-यांना बोलावलेल होत. मी परस्पर जेव्हा फॉलोअप घेतो तेव्हा गोड बोलण्या पलीकडे दुसर काहीच वाटयाला आलेल नाही. यापुर्वी देखील परदेशी साहेब यांच्याकडे तेथील सुत्र होती आता

मा.जाधव साहेबाकडे सुत्र आहेत. खुप सिरीअस गोष्ट अशी आहे त्यामध्ये तीन प्रकारचे कर्मचारी आहेत. पीएमटीचे कर्मचारी, पीसीएमटीचे कर्मचारी आणि कंत्राटी पध्दतीचे कर्मचारी आहेत. मुळामध्ये कंत्राटी पध्दतीचे कर्मचारी त्यामध्ये मोठया प्रमाणात आहेत. हा काय नेमका प्रकार आहे ते समजत नाही. एक शासकीय संस्था त्याच्यावरचा प्रमुख आयएएस अधिकारी असतो आणि शासनाने घालून दिलेल्या कामगार नियंमांच याठिकाणी उल्लंघन केल जात. माझ्या माहीतीप्रमाणे भोसरी डेपोमधील जवळपास ३०० ड्रायव्हर मा.आमदार विलासराव लांडे यांच्याकडे आलेले होते. आमदारानी त्यावेळेला लक्ष घातल तो प्रश्न त्यावेळेला तात्पुरता मार्गी लागलेला आहे. परंतु या कंत्राटी कामगाराना तीन तीन, चार चार महीने पगार मिळत नाही. त्यांची पीएफ, ग्रॅच्युएटी कापली जात नाही. त्यांना किमान वेतन मिळत की नाही या विषयी देखील पुरेशी माहीती नाही. त्यांनी केलेल्या अतिरीक्त कामाचा त्यांना मोबदला दिला जात नाही. याच्या उलट जर गाडीला थोडासा स्क्रॅच झाला कुठे काही झालतर त्यातून त्यांचा दंड कापला जातो. आदिच पगार तोकडा द्यायचा तोही वेळेवर दयायचा नाही त्यांना कुठल्याही सुविधा दयाच्या नाहीत त्यांना कुठल्याही मेडीकल फॅसीलीटी नाहीत असे आहे. आपण जनतेचा पैसा जमा करुन या संस्थेसाठी दयायचा जनतेला प्रवासाची जी सोय पाहीजे ती तर मिळत नाहीच पण किमान त्याठिकाणी काम करत असलेल्या कामगाराना जर व्यवस्थितपणे त्यांचा पगार, बेनीफीट मिळत नसतीलतर मला वाटते शासनच शासनाची याठिकाणी दिशाभूल करते. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे पीएमपीएमएलचे अधिकार आपल्याकडे आहेत. जर या पध्दतीचे उल्लंघन संस्थेचे संबंधीत अधिकारी करत असतीलतर आपल्याला त्याच्यावरती निश्चितपणाने लक्ष घालाव लागेल. ही कंत्राटी पध्दत मुळातच त्याठिकाणी असण गरजेची आहे का? जर ती गरजेची वाटत असेलतर आपल्याला त्याच्यावरती निश्चितपणाने शासनाचे नियम त्याठिकाणी पाळले जातात की नाही हे सुध्दा पाहणे तीतकेच गरजेचे आहे. त्याच बरोबर दुसरी एक धक्कादायक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे त्या कामगरांना पगार दिला नाही म्हणून, त्या कामगरांनी त्याठिकाणी काम करणार नाही असा इशारा दिला. लगेच दुस-या, तीस-या दिवशी बाहेरचे गुंड अणून त्या कामगरांना दमदाटी करण्याच काम केल. हे नमके कोण कंत्राटदार आहेत. पीएमपीएमएलच्या या पैशामधून कोणाच नेमक फावल जातयं. प्रवाशांच्या सोईसाठी, जनतेच्या सोईसाठी ही संस्था चालवली जातेय का एखादया कंत्राटदारासाठी ही संस्था चालवली जातेयं. त्याच्या पाठीमागे कोणत्या शक्ती काम करतात हे देखील निश्चतपणाने आपण तपासावं. मुळात असं घडलच नाही पाहीजे अशी आमची ठाम भावना आहे. त्याच बरोबर जे रुट आहेत त्याबाबत देखील आपला जो विस्तारीत भाग आहे त्या विस्तारीत भागामध्ये संबंधीत नगरसेवक असतील त्या नगरसेवकांच्या सूचनेप्रमाणे त्याठिकाणी रुटचा विचार होण गरजेच आहे. साधा बसस्टॉप एखादया ठिकाणी मागीतलातर ते लोक उडवाउडवीची उत्तर देतात मग हे नेमक कंट्रोल करायच कोणी त्याच्यावरती कोणी आहे का नाही याचा फार गांभीर्याने विचार केला पाहिजे. केवळ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे पैसे आहेत आपल्याला पैसे देण भाग पडतं, हा शासनाचा आदेश आहे आणि आपल एक ऍ़ग्रीमेंट आहे आपण ते ऍ़ग्री करायचे पैसे द्यायचे आणि गप्प बसायचं या पध्दतीच जर कामकाज चालत असेलतर ते योग्य नाही असं मला याठिकाणी म्हणायचं आहे.

**मा. धनंजय आल्हाट** - सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सभागृह. शासन निर्णयास अधीन राहून पीएमपीएमएलला निधी देण्याच्या संदर्भात हा विषय आहे. मागच्या वेळेस अशाप्रकारचा विषय या ठिकाणी उपस्थित झालेला होता त्यावर सुध्दा सर्व सदस्यांनी आपली मते याठिकाणी मांडलेली होती. मुळात पीएमपीएमएल ही स्वतंत्र संस्था आहे. परंतु नियंत्रण मात्र कुठल्याही प्रकारचे आपल्या प्रशासनाचे नाही. अशाप्रकारचा निधी देत असताना, शासन निर्णय मान्य करणे हे आपल्याला बंधनकारक असताना काही अटी, शर्ती आणि काही नियमाला अधीन राहून आपण जर तो निधी त्या ठिकाणी वर्ग केलातर ते सोईस्कर होईल. कारण आपला जरी येथे स्वतंत्र कक्ष महापालिकेमध्ये असला तरी त्याठिकाणचे अधिकारी आणि त्याठिकाणच जे कामकाज आहे ते अतीशय कमी प्रमाणाच आहे म्हणूनच पुण्यामधे त्या कार्यालयास सर्व सभासदांना पत्रव्यवहार करावा लागतो आणि कुठल्याही पत्राचे उत्तर मिळत नाही. त्यांच्या निर्णयावर अवलंबून रहावे लागते आणि आजपर्यंतची परिस्थिती पाहता शहराचे दळणवळण, ट्रान्सपोर्ट हा खरतर शहराच्या प्रतिष्ठेचा आरसा मानला जातो. परंतु या प्रश्नाकडे कधीही प्रशासनाने गांभीर्याने पाहीलेले नाही. आपण जर परदेशातील ट्रान्सपोर्ट पाहतो त्यावेळेस आपल्याला तेथील वाहतूक नजरेला येते आणि आपण त्यांची स्तुती करतो. कारण दळणवळण हा या शहराच्या प्रतीष्ठेचा, वैभवाचा आरसा आहे. आजपर्यंत पुर्णपणे या प्रश्नाकडे कानाडोळा केलेला आहे मला वाटतं या विषयाचे गांभीर्य आपण लक्षात घेतले पाहीजे. पीएमपीएमएलमध्ये सदस्य म्हणून महापौर, आयुक्त, आहेत. त्याठिकाणी अंतर्गत नियंत्रण समिती या सभागृहामध्ये नेमली त्या कमिटीन एक चांगल्याप्रकारे कामकाज घेवून जर याठिकाणी तशी मिटींग घेतलीतर त्या ठिकाणी चांगल्याप्रकारचा फेरबदल परीवर्तन घडवून येईल आणि आपल्या महापालिकेच्या वैभवामध्ये भर पडेल. कारण आपण शहराची पुर्ण परिस्थिती जर पाहीलीतर बसस्टॉपची अवस्था अतीशय दयनीय आहे. खरंतर या श्रीमंत महापालीकेच्या या शहराच शांघाय करण्याच्या वल्गना करतो परंतु प्रत्यक्षात कृतीत मात्र काहीच येत नाही. येथील बसस्टॉप पाहीलेतर त्यापेक्षा खेडेगावातील बसस्टॉप सुध्दा चांगले असतात. अत्यंत तोकडे आणि त्या मातीवरती रोवलेले त्याला कुठल्याही प्रकारचे सिमेंटचे फौंडेशन नाही त्याला कुठल्याही प्रकारचे ढोबळ व कुठल्याही प्रकारचे आकर्षण नसलेले हे बसस्टॉप म्हणजे प्रशासन आणि पीएमपीएमएलच्या कारभाराचा सगळा देखावा करत आहे आपण त्यामध्ये बदल घडवून आणले पाहीजेत. मागच्या वेळेस तत्कालीन आयुक्तांनी एक मॉडेल बसस्टॅण्डची प्रतीकृती दिलेली होती. त्याच्यावर किती काम झाले हे माहीत नाही. त्यामध्ये अटी होत्या, सन्मा.सदस्यांनी स्वत: खर्च करायचा ती अत्यंत विलक्षण आणि वस्तुस्थितीला न धरुन, अव्यवहारीक अशाप्रकारची अट होती ती कुठलाही नगरसेवक स्वत:चे पदरचे पैसे घालून अशाप्रकारचे बसस्टॅण्ड निर्माण करेल असे मला वाटत नाही. हे करदाते याठिकाणी टॅक्स भरत असतात त्या करदात्यांना आपण अशाप्रकारच्या सुविधा का देवू शकत नाहीत याचाही आपण याठिकाणी विचार केला पाहीजे. पुणे महानगरपालीकेनी अशा पध्दतीने तरतूद केलेली आहे आपण सुध्दा याठिकाणी विशेष तरतूद बसस्टॅण्डसाठी करावी. जेणेकरुन खाजगी संस्था असेल, उदयोजक असतील, नगरसेवक असतील त्यांच्यावर अवलंबून न राहता स्वत:चा निधी उभा करावा, आकर्षक अशा पध्दतीने बसस्टॅण्ड करावेत अशी माझी पहीली सूचना आहे. आधुनीक काळात फॉरेन बनावटीच्या अनेक बसेस त्याठिकाणी उपलब्ध असताना त्याच पध्दतीच्या दहा-वीस

वर्षाच्या जून्या गाडया अजूनही त्याठिकाणी मार्गावर आहेत हे पाहून अत्यंत दु:ख होते. या महापालीकेच्या वैभवाची कुणाला काळजी आहे का नाही याच्यामध्ये काही बदल घडणार आहेत की नाहीत. केवळ आपण त्याठिकाणी पीएमपीएमएलला निधी देतो परंतु कुठल्याहीप्रकारे त्यांना नियमाला अधीन राहण्यास भाग पाडत नाहीत हे आपल्या सगळयांच दुर्दैव आहे. म्हणून अशा पध्दतीन आजपर्यंत जे काही पीएमपीएमएलला पत्रव्यवहार केलेले आहेत त्याच कुठलही उत्तर याठिकाणी येत नाही. मा.महापौर साहेब, मी याठिकाणी सूचना करतो की जे जे सन्मा.सदस्य नवीन रुट मागतील ते त्यांना मिळाले पाहीजेत. त्याठिकाणच्या कामगारांचा प्रश्न आमच्या सन्मा.सदस्यांनी याठिकाणी मांडलेला आहे. या महापालीकेमध्ये काम करणारे जूने कर्मचारी आपण त्याठिकाणी वर्ग केले. त्यांचे अजूनही प्रश्न प्रलंबीत आहेत. त्याना त्याठिकाणी न्याय मिळत नाही. आस्थापना मात्र महापालीकेची लागू होते परंतु कुठल्याही प्रकारच्या त्यांना सवलती मिळत नाहीत याकडेही आपण लक्ष दिले पाहीजे. सर्वात महत्वाच म्हणजे प्रत्येक जीबी मध्ये सभासद आपली मत मांडतो आणि हे सभागृह ख-या अर्थाने जनतेचे प्रश्न सोडवीण्याचे मंदीर आहे. या सभागृहाला अत्यंत अनन्यसाधारण असं महत्व आहे त्यांचे प्रश्न शहराचे, नागरीकांचे सभासद अत्यंत पोटतीडकीने याठिकाणी मांडत असतात. परंतु दुर्दैव आपल केवळ त्याठिकाणी मिनीटस रेकॉर्डीग करत असतो पण त्या सभासदाला त्याच्या प्रश्नाच उत्तर लेखी स्वरुपामध्ये अजूनही मिळालेल नाही. तेच तेच जूने प्रश्न घेवून नगरसदस्य याठिकाणी बोलतात. प्रत्येक मिटींगला जूनेच प्रश्न परंतु नवीन प्रश्न कुठेतरी तो सदस्य मिटींगला मांडत असतो. सर्व सदस्यांच्या वतीने आपल्याला विनंती आहे की सदस्य जे मत, जी मागणी सभागृहात करतात त्याच उत्तर ज्या पध्दतीने आपण सभावृत्तांत घरी पाठवीतो, सभेचा अजेंडा ज्याप्रमाणे घरी पाठवीतो त्याप्रमाणे येथे मांडलेल्या मागणीचा, मतांचा जो काही निर्णय आहे, होय असेल किंवा नाही असेल, नाही असेलतर, का? अशा पध्दतीचे उत्तर त्या सभासदांना पाठविणे गरजेचे आहे. तो लोकशाहीचा संकेत आहे तो पाळणे गरजेचे आहे. सभासद पोटतीडकीने प्रश्न मांडतात केवळ आरडाओरड होतो पण त्याची प्रशासन दखल घेत नाही. यापुढे कुठल्याही प्रकारची मागणी असेलतर त्याचे लेखी उत्तर सभासदांना मिळावे. मा.महापौर साहेब, आपला कालखंड संपत आलेला आहे, आपण चांगले निर्णय घेतलेले आहेत. आपला संयम आणि आपले निर्णय हे खरोखर कौतूकास्पद आहेत. याठिकाणी अतीशय मुरब्बी राजकारणी पध्दतीने आपण या सभागृहाच कामकाज केलेले आहे. आणि आपल्या कामकाजाचा हा शेवटचा पर्व आहे त्यामध्ये चांगला निर्णय घ्यावा. आम्हांला सुध्दा आपली आठवण येईल की या सभागृहामध्ये आपण चांगला निर्णय घेतलेला आहे, आमच्या प्रश्नांचे उत्तर आम्हांला घरपोच मिळतात याच समाधान आम्हांला मिळेल व ते कोणी केलतर मा.महापौर मोहीनीताई लांडे यांनी केल असे आम्ही ठणकावून सांगू शकू म्हणून याठिकाणी सर्वाच्या वतीने मी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अनेक दिवसापासून पीएमपीएमएलच्या माध्यमातून चर्चा करतो, आपल्या कामगारांच्या व्यथा मांडतो, नगरसेवक व्यथा मांडतात. आपल्या भागातील कामगार त्याठिकाणी विलीन झालेला आहे. त्या कामगारांची व्यथा अनेकवेळा या सभागृहामध्ये प्रत्येक नगरसेवकांनी आपआपल्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न

केलेला आहे. आज माझा प्रश्न आपल्याला आहे की पीएमपीएमएल ही कंपनी रजिष्टर्ड झालेली आहे का? आणि रजिष्टर्ड झालेली असेल किंवा त्या कंपनीचे नियम आहेत त्यामध्ये अटि, शर्ती काय आहेत त्याची सविस्तर माहीती दयावी त्या माध्यमातून काही प्रश्न कामगारांचे आहेत. आपल्या कामगारांना त्याठिकाणी सवतीची वागणूक दिली जाते, आतापर्यंत कुठलाही कामगार त्याठिकाणी समाधानी नाही. ज्यावेळेस रुटवर बस सोडल्या जातात त्यावेळेस आपल्या भागामध्ये रुटवर सोडलेल्या बस जुन्या दिल्या जातात आणि पुणे महापालिकेच्या रुटवर सोडलेल्या बस चांगल्या नव्या सोडल्या जातात. आज आपण ४० टक्के ६० टक्के निधी देतोत किती दिवस हा निधी देणार, ऍग्रीमेंटमध्ये काय ठरलेले आहे. आपण जर निधी देणार असूतर आपला नैतीक अधिकार आहे आपल्या कुठल्याही कामगारांना कुठलाही त्रास होणार नाही याची जबाबदारी घेण्याचे काम आपले आणि सभागृहाचे आहे. आम्ही अनेकवेळा पत्र दिलेले आहे. २००७ पासूनचे माझे कमीत कमी १०० ते १५० पत्र असतील परंतु एकाही पत्राची उत्तर आलेले नाहीत. आमच्या चिखली प्राधिकरणात असे अनेक रुट लिहून दिलेले होते एकही बस चालू करण्याची भूमीका यांनी घेतलेली नाही. आमच्या भागामधील अनेक विद्यार्थी शाळेत जातात त्याठिकाणी रुटवर बस येत नाही. ज्या ज्या भागातील रुट दिलेले आहेत त्यावर आजपर्यंत एकही बस चालू केलेली नाही. सगळयात जास्त रुट आमच्याकडे चालतात. ज्या ज्यावेळी बस विद्यार्थ्यांना आणण्यासाठी गेलेल्या आहेत त्यावेळी त्या बसेस रस्त्यामध्ये बंद पडलेल्या असतात त्यामध्ये विदयार्थी असतात, कामगार असतात त्यावेळेस यांची दोन-दोन तास दुसरी गाडी येत नाही ती गाडी एक एक दिवस त्या जागेवरुन हालत नाही अशा पध्दतीने आपल्याकडे चाललेले आहे. साहेब, मी तुम्हांला एक उदा.देतो माझ्या भागातील पीएमपीएमएलचे शिंदे नावाचे एक ग्रहस्त आमच्याकडे आहेत ते रिटायर्ड होवून चार ते पाच वर्षे झाले त्यांना हार्टचा प्रॉब्लेम आहे ते आता हॉस्पिटलला आहेत. अशी अनेक उदाहरण आहेत. त्यांची ग्रॅज्यूएटी किंवा जो रिटायर्डमेट नंतर निधी मिळतो तो अजूनही मिळालेला नाही, त्यांची मिसेस रडत होती त्यांन त्यांचे घर विकण्यासाठी काढलेले आहे एवढी वाईट अवस्था झालेली आहे. असे असेलतर आमची पीसीएमटीच राहू द्यात. आमच्याकडून पैसे घ्यायचे, आमचेकडून निधी घ्यायचा आमचे कामगार मरणाच्या दाराला आहेत त्यांचे पैसे वेळेवर देत नसतीलतर काय उपयोग आहे. अशी रिटायर्ड झालेली अनेक माणस आहेत. त्यांनी आयुष्यभर केलेल्या काबाडकष्टाचा निधी /पगार त्यांना वेळेवर मिळत नसेलतर त्यापेक्षा दुर्दैव काय असेल. “हात दाखवा तेथे बस थांबवा” हे आपले ब्रीद वाक्य आहे. विद्यार्थ्यांनी हात दाखविलातर कुठेही बस थांबलेली नाही. एस.टी.महामंडळाचे प्रत्येक ठिकाणी बसस्टॉप असतो त्यांच वेळापत्रक असते. आपल्याकडे कुठल्याही बसस्टॉपवर वेळापत्रक नाही. कसा तो नागरीक त्या बसस्टॉपवर थांबेल. यांचे जे अधिकारी आहेत नां त्यांनी रीक्षावाल्याबरोबर कॉम्प्रमाईज केली ज्याठिकाणी रिक्षा चालतात त्याठिकाणी यांच्या बस कमी असतात हा माझा आरोप आहे. पिंपरी चिंचवड मध्ये आरटीओ चौकामध्ये असतात ते टु,थ्री व्हीलर वाल्यांना अडवणार परंतु रिक्षावाले असतात त्यांना आडवत नाहीत. हे बसवाले सुध्दा पाठीमागे थांबणार आणि रिक्षावाल्यांना पुढे जाऊ देणार असं यांच चाललेल असतं. माझी विनंती आहे की ज्या सदस्यांनी आपल्याकडे जे जे रुट मागीतलेले आहेत त्या रुटची पुर्तता करुन त्यावर या बसेस चालू दयाव्यात. आमच्याकडे सगळया डबडा बसेस आहेत त्या काढून घ्याव्यात. अशा डबडा बसेस आमच्याकडे दिल्यातर

आम्ही त्या पेटवून देवू. उदया काय होणार ते आम्ही बघून घेवू. सवतीची वागणूक आम्ही बघणार नाहीत. आमच्या सर्वसामान्य नागरीकांचे कररुपाने पैसे गोळा करुन यांना दिले जातात व त्यातून आपली पीएमपीएमएल चालते. मीतर म्हणतो आपल स्वतंत्र घर करा दुस-याच्या घरामध्ये जावुन सासूरवास भोगण्यापेक्षा आपल्या स्वत:च्या घरात राहून मीठ, मिरची खाललेली बरी. साहेब, आपण आदेश दयावेत जे नगरसेवकांचे विषय आहेत ते व्यवस्थीत मार्गी लावावेत. एखादया कामगाराना ती बस कुठल्या थांब्यावरुन कुठल्या वेळेत येते हे त्याला टाईमींग माहीती नसेलतर, किंवा ही बस या या वेळेला येते हे जर मला माहीती नसेल, त्याचे रुट जर माहीती नसतीलतर तो काय करणार ही कसलीही व्यवस्था नाही. आता पावसाळा आलेला आहे लोकांनी छऱ्या घेवून बसस्टॉपवर उभा रहायच का. आपल्या शहरामध्ये, बाहेरच्या रुटमध्ये व्यवस्थीत असा कुठही बसथांबा दिसला नाही. दिसलातर मी माझ्या वतीने बक्षीस जाहीर करतो. एवढया मोठया आपण बस घेतलेल्या आहेत त्या स्पाईन् रोडच्या ठिकाणी उभा केलेल्या आहेत. ४०० ते ५०० बस त्याठिकाणी उभा केलेल्या आहेत मग त्या रुटवर का सोडत नाहीत आणि जून्या का काढत नाहीत हा सुध्दा प्रश्न आहे. ज्यांची ग्रॅज्यूएटी थांबलेली आहे, रिटायर्डमेन्ट नंतरचा निधी थांबलेला आहे तो पंधरा दिवसात म्हणजेच २० तारखेच्या आतमध्ये त्यांना देण्याची व्यवस्था करावी आणि संचेती हॉस्पिटलमध्ये जो माणूस जखमी आहे त्याना सुध्दा मदत करण्याची व्यवस्था करावी. महापौर साहेब, पीएमपीएमएलच्या अधिका-याना आदेश दयावेत की ज्या दिवशी आपली मिटींग असेल त्या दिवशी आपल्या नगरसेवकांना हे भेटणार आहेत इतर दिवशी कोणीच भेटणार नाहीत. साधा फोन सुध्दा उचलत नाहीत. गवळी साहेबांना तर साधं नगरसेवकांशी कस बोलायच याच गद्यपद्य काहीच नाही. शिफ्टला बस कोणत्या आहेत हे माहीत नाही असे अधिकारी आहेत. कोणाच्या जीवावर उडया मारतात हे माहीत नाही. कोणाचे आदेश आहेत हे आम्हांला माहीत नाहीत. ही बस व्यवस्था पहीली जशी होती तशी ठेवावी आणि आमच्या बस आम्हांला परत दयाव्यात अशी विनंती करतो.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पीएमपीएमएलच्या विषयावर बरेचसे सदस्य बोललेले आहेत. मी एक ते दिड वर्षापुर्वी सात ते आठ रुट वाढवीण्यासाठी पत्र दिलेले होते त्याचे उत्तर दोन महीन्यानी आले, ते असे आले की ज्याठिकाणी रुट वाढवायचा आहे त्याठिकाणी लोकवस्ती कमी आहे. त्याठिकाणी लोकवस्ती किती आहे हे मला माहीत आहे. त्याठिकाणी दहा ते पंधरा हजार लोक राहत असताना असे खोटे उत्तर दिलेले आहे व एकही रुट वाढवीलेला नाही. पीएमपीएमएलच्या नवीन बस पिंपरी चिंचवडमध्ये बॉम्बे-पुणे रोडलाच दिसतात व जुन्या बस आऊटसाईडला दिसतात. दापोडी असेल, निगडी असेल यांच्या तुलनेमध्ये जास्तीत जास्त भरणा पिंपळेगुरव मधुन होत असतो परंतु बसची अशी अवस्था आहे की नवीन बस एकदाही पाहीलेली नाही. सर्व जुन्याच बस आहेत. पुर्वीचीच पीसीएमटी बरी होती कारण आपल्याला नवीन बस खरेदी करता येत होत्या. त्यावेळेस अधिकारी सुध्दा खुष होते परंतु आता आपली महापालिका पीएमपीएमएलला बरेचसे पैसे देत आलेली आहे त्यांचेकडून आवूटपुट काही नाही याकडे गांभीर्याने लक्ष दयावे. पीएमपीएमएलचे रुट, बसस्टॅण्ड याची अवस्था पाहिली पाहीजे. अशा पध्दतीने चाललेल्या कारभाराकडे लक्ष दयावे.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पीएमपीएमएलची परिस्थिती बीकट असल्यामुळे हे १३.५० कोटी त्यांना अदा करावयाचा अवलोकनाचा विषय आलेला आहे. या अगोदर वायसीएमएचचा विषय झाला, त्याठिकाणी खरेदी वायफळ झाल्यामुळे त्याची माहीती आज सभागृहामध्ये ठेवावी लागते. अधिका-याने भ्रष्टाचार केला किंवा स्टॅण्डींग कमीटीने केला असे आरोप होऊ लागलेले आहेत. पीएमटी व पीसीएमटीचे त्यावेळेस ऍग्रीमेंट झालेले होते त्यावेळेस ठरलेले होते की ही आपण स्वतंत्र संस्था करतोय आणि त्याला आपण नंतर पैसे देणार नाहीत. पण नंतरच्या काळामध्ये त्यांनी वेगवेगळया मुद्दयांसाठी पैसे मागणी केली आणि आपल्याला ते द्यावे लागले. कारण जनतेचा विषय असल्यामुळे सहकार्य कराव लागतं. ऑडीटपॉईंट मध्ये पैसे द्यायचे नाही असे ठरलेले होते तरी सुध्दा आपण पैसे देतो. नंतरच्या काळामध्ये नवीन गाडया घेतलेल्या आहेत त्या गाडया रुटवर नाहीत, बीकट परिस्थिती येणारच. जेएनएनयुआरएम मधून एवढे पैसे खर्च करुन गाडया घेतल्या तरी त्या रुटवर नाहीत कारण आपल दुर्लक्ष आहे. मा.महापौर, स्थायी समिती चेअरमन, आयुक्त त्याठिकाणी सदस्य म्हणून आहेत. आपण जर पाहीलतर आज आपल्या परीसरामध्ये बसस्टॅण्ड नाहीत त्यामुळे बसची वाट बघत नागरीकांना ऊन्हामध्ये उभे रहावे लागते, गाडया पाहील्यातर जुन्या गाडया आपल्याला दिलेल्या आहेत. आपल्या लोकांची सोय आपण केली पाहीजे म्हणून आपण सहकार्य करतो परंतु पुणे महापालीकेकडून आपल्याला दुजाभाव मिळतो. ज्या ज्या वेळेस ते पैसे मागतात त्या त्या वेळेस आपण त्यांना पैसे देतोत. आयुक्त साहेब आपल्याकडे प्रभारी चार्ज आहे पीएमपीएमएलचे अधिकारी सांगतील, पीसीएमटी आणि पीएमटीचे जे ऍग्रीमेंट झालेल आहे ते काय झालेल आहे हे सांगावे. दुसरी गोष्ट म्हणजे नवीन खरेदी केलेल्या बस रुटवर का आल्या नाहीत. सदस्य गांभीर्याने विषय मांडतात त्याचा गांभीर्याने विचार केला जात नाही. निगडी बसस्टॉपच्या तेथे चौकामध्ये एवढी गर्दी असते सगळया बस त्याठिकाणी लागलेल्या असतात आम्ही विनंती केली होती की निगडी जकातनाक्याच्या तेथील जो भाग आहे त्याठिकाणी बसस्टॉपसाठी जागा आपण ऍक्वायर केलेली आहे बसस्टॉप तयार केले त्याठिकाणावरुन बस सोडावी, तरी सुध्दा त्याचा विचार केला जात नाही. अशा आम्ही तक्रारी केल्यातर त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि आपण डोळे झाकून पैसे द्यायचे का? तरी माझी विनंती आहे की पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी याचे उत्तर दयावे. धन्यवाद.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, या विषयावर सदस्य एवढे तळमळीने बोलतात. यामागे अनेकवेळा चर्चा झालेली आहे परंतु कुठल्याही प्रकारचा घाम पीएमपीएमएलच्या अधिका-यांना फुटलेला नाही. प्रत्येक वेळेस चर्चा होते, ऐकूण घेतली जाते. पिंपरी चिंचवडकरांची त्यांना कुठल्याही प्रकारची चिंता किंवा जबाबदारी वाटत नाही. अनेकवेळा कुठलेही सभासद, पदाधिकारी त्याठिकाणी गेलेतर पाहीजे तशी वागणूक आजपर्यंत मिळालेली नाही. हे फक्त येथे येणार, ऐकूण घेणार, पैसे घेणार निघून जाणार परंतु त्यांच्याकडून आजपर्यंत कुठलाही निर्णय घेतलेला नाही. आतापर्यंत किती काम त्यांनी केलेले आहे हे बघावे. परत त्यांना हा निधी लागणार नाही तोपर्यंत ते तोंड सुध्दा दाखवणार नाहीत. प्रत्येक जी.बी.च्या सभेला त्यांचे अधिकारी याठिकाणी पाहीजेत. त्यांचे अधिकारी याठिकाणी येत

नाहीत. येथीलच एक अधिकारी कायमस्वरुपी याठिकाणी का मागवून घेत नाहीत. का म्हणून आपण त्यांच्या दारामध्ये जायच. दुसर एक महत्वाच म्हणजे अनुकंपा तत्वावर एक महीला याठिकाणी आली, तीचे मीस्टर पुर्वी त्याठिकाणी कन्डक्टर म्हणून काम करत होते. यांचा आग्रह आहे की त्यांनी लगेच कन्डक्टर म्हणून कामावर जावे. तीन कस जायच, ती अजून तीच्या मानसीक संतुलनातूनच बाहेर आलेली नाही. एवढंही सहकार्य यांनी करु नये का? आता तीला तात्पुरत्या स्वरुपामध्ये याठिकाणी मा.महापौरांनी, चेअरमनने सांगीतल, पाठपुरावा केला म्हणून महीनाभर पास देतात त्याठिकाणी बसवल. परत आता तीला सांगीतल जात एक महीना झाला तुमच पुढ काय, एक महीना झाला तुमच पुढ काय. तीची मानसीकता तरी तयार होवू दया. मला अस म्हणायच की तुमच्याकडे अशी लोक नाहीत का, की दुसरीकडे तुमचे लोक काम करत नाहीत. अस असताना त्या महीलेला गरज आहे तीला तुमच्याकडे घेवू शकत नाहीत. मा.महापौर साहेब, येथून पुढे याठिकाणी जीबीला त्यांचा अधिकारी आलाच पाहीजे. जरी ती संस्था वेगळी असलीतरी ही पब्लिक रीलेटेड संस्था आहे. त्यामुळे प्रत्येक जीबी ला याठिकाणी त्यांचा अधिकारी पाहीजे. आताच राजेंद्र जगताप यांनी बसेसच सांगीतल. पिंपळेगुरव, दापोडी या भागामध्ये जाणा-या ज्या गाडया आहेत त्या अतीशय कमी प्रमाणात गाडया आहेत. मी माहीतीच्या अधिकारामध्ये माहीती घेतलेली आहे, सर्वात मोठयाप्रमाणात त्याठिकाणचा रेव्हेन्यू मिळतो आणि त्याच ठिकाणी बसेस कमी आहेत. अक्षरश: लोक त्याठिकाणी उभे राहून प्रवास करतात. दिड वर्षापासून मी सांगतो त्याठिकाणच्या बसेस वाढवाव्यात म्हणून, परंतु अदयाप त्या वाढवीलेल्या नाहीत, फक्त ऐकूण घेतात, लिहून घेतात पण कुठल्याही प्रकारची ॲक्शन तुमच्याकडून घेतली जात नाही. आयुक्त साहेब, पुढच्या काळामध्ये यांना कुठतरी वटणीवर आणल पाहीजे. आमच्याकडे कुठल्याही प्रकारचा व्यवस्थीत बसथांबा नाही, पाऊस पडला की लोकांनी पावसामध्येच उभा रहायच का? तात्पुरत शेड तरी टाकून घ्या काहीतरी योजना राबवा अशी मी विनंती करतो.

**मा.सुरेश म्हेत्रे –** मा.महापौर साहेब, आजचा हा विषय अवलोकन करणेकामीचा आहे. ऑपरेशनल लॉसेस नक्की कशामुळे येतो. यामध्ये अनेक कारण असू शकतात. कर्मचा-यांची ईफीशिअन्सी असू शकते, त्यांच्या पगारामुळे लॉस होतो का? रिपेअर आणि मेन्टेनन्सच्या नावाखाली आपले पैसे जास्त जातात का? बसस्टॉपवर पैसे खर्च होतात का? स्टोअरमध्ये, स्पेअरपार्ट जे खरेदी करतो यावर काही कंट्रोल आहे का? रिपेअर, मेन्टेनन्स, स्टाफ आहे तो अनधिकृत आहे का? कारण अनेक ठिकणी अनावश्यक स्पेअरपार्ट बदलले जातात का? उदा. क्लच प्लेट, फ्यूअल पंप, गीअर बॉक्सेस, बॅटरी हे गरजेनुसार बदलले जातात का? ल्यूब्रीकंट ऑईल जे लागते ते वेळेवर बदलले जाते का? का आगोदर बदलल जात येथेही आपला लॉस होउ शकतो. फ्यूअल कन्झम्शन असेलतर ऍव्हरेजचा प्रॉब्लेम येतो फ्यूअलवर, डिझेलवर जास्त पैसे जातात का? हे सुध्दा तपासणे जरुरीचे आहे. बसरुटवर प्रॉब्लेम आहेत का? जेथे पॅसेंजर मिळत नाहीत त्यामुळे लॉस होतो का? नेमका ऑपरेशनल लॉस कशामुळे होतो. आयुष्यमानाच्या अगोदर बसेस रिपेअर केल्या जातात का? असे अनेक कारणास्तव नक्की लॉसेस कशामध्ये आहे याची आपण माहीती घेणे गरजेच आहे. हा लॉस थांबवणेसाठी निश्चित आपण प्रयत्न केले पाहीजेत. अन्यत: आपण दरवेळेस ऑपरेशनल लॉसेस खाली आमच्याकडून

रक्कम घेणार ते कुठही व्यवहार्य ठरणार नाही. दुसरा विषय असा आहे की आज जसे जाधव साहेब एक महीन्यासाठी अध्यक्ष आहेत तसे परदेशी साहेब सुध्दा पुर्वी एक महीना अध्यक्ष पदावर होते आणि त्यांनी बसस्टॉप करावेत म्हणून अवाहन केल होत त्याबाबत मी आपल्याला चार वेळा फोन केला त्याच्या डिझाईनमध्ये थोडा बदल करुन माझ्या तीन लाख रुपये वैयक्तीक खर्चाने तो बसस्टॉप उभारला आणि त्याचे गेल्या २० तारखेला मा.महापौर यांचे हस्ते उदघाटन केले. परंतु त्यांचा करारनामा करण्यासाठी मी अनेकवेळा फॉलोअप केला परंतु अदयाप काहीही झालेले नाही. उदया कोणीही आलं आणि बसस्टॉप काढलातर मला काही बोलता येणार नाही. म्हणजे ही मालकी कशा पध्दतीने करायची याबद्दल मी काही सुचना केल्या होत्या. तेथे दोन जाहीरातीचे जे बोर्ड आहेत त्यातील एक जाहीरातीचा बोर्ड दहा वर्षासाठी दयावा आणि त्याचे उत्पन्न घ्यावे. कोणाचही लक्ष तीकडे नाही. अशा प्रकारे आपण या केलेल्या बसस्टॉपचा करारनामा करण गरजेच आहे आणि त्याच्या उत्पन्ना विषयी बाबी निश्चित करुन घेतल्या पाहीजेत. तुम्हांला अनेक त्याचे निर्माते, प्रायोजक मिळतील. त्याच्या उत्पन्नाच निश्चित धोरण ठरवाव. राजेंद्र काटे यांनी एका महीलेचा विषय सांगीतला तसं माझ्या नातेवाईक कामगाराचे हार्टचे बायपास ऑपरेशन झाले आणि त्याला हलक्या स्वरुपाच काम दयाव त्याला त्रास होणार नाही असं काम दयाव म्हणून अर्ज दिलेला होता. त्यावर त्याला पास केंद्रावर पुण्याला ठेवल व तो देहूला राहतो. पास केंद्रावरच सुध्दा वातावरण त्याला सुट होईना मग परत त्यांन आपल्या पिंपरी चिंचवड परिसरामध्ये बदली मागीतली तोही अर्ज मी दिला परंतु त्यावर आपल्याकडून काहीही रिप्लाय आलेला नाही किंवा कार्यवाही केलेली नाही. असे होता कामा नये आमची कळकळीची विनंती आहे की खरंच गरजू व्यक्तीना आपण अशा कामामध्ये बदल करुन देणं गरजेच आहे. महत्वाच म्हणजे बीआरटीएस रुटमध्ये महापालिका करोडो रुपये खर्च करते आपण जर ही सुधारणा केली नाहीतर या करोडो रुपयाचा काहीही उपयोग होणार नाही म्हणून आपल्याला यामध्ये बदल करनं आवश्यक आहे त्या रुटमध्ये बस व्यवस्थीत चालल्या पाहिजेत. नाहीतर हे सभागृह बोललं ते खरोखरच व्यर्थ न जाओ बडबड असं म्हणाव लागेल. तरी आयुक्त साहेब, आपण या सुधारणा करण्याच्या दृष्टीन निश्चित प्रयत्न करावेत, धन्यवाद.

**मा.शमीम पठाण-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य यापुर्वी विषय झालेला आहे याचे मिनीटस काढले आणि आयुक्त साहेबांनी पाहीलेतर समजेल परंतु आपण नवीन आहात म्हणून बोलायच आहे. सभागृह तेच आहे आणि आमचं बोलनही तेच आहे. आताच मा.दत्ता काका साने यांनी संगीतलेल आहे. ही संस्था स्थापन होऊन किती वर्षे झाले. आपल्याला जर मागणी केली की, हे पीएमपीएमएलचे बायलॉज दाखवा, आयुक्त साहेब ते जर तुम्हाला सापडले, तुमच्या निदर्शनास आलेतर कृपा करुन ते आम्हांला दया. यापुर्वी मागणी केलेली होती आणि सर्व सभागृहाला ते सादर करावेत म्हणजे कोणत्या नियमाने यांचा कारभार चालला आहे हे समजेल ही संस्था म्हणून कायदेशीर अस्तित्वात आहे का? कारण मला नाही वाटत की त्यांचे अजून बायलॉज तयार आहेत. अशाकरता मला त्यांच उत्तर पाहीजे. आपण प्रश्न लीहून घ्यावा पीएमपीएमएलचे बायलॉज तयार आहेत काय? आणि आम्हांला ते आज किंवा उदया मीळतील काय? त्याला कायदेशीर मान्यता आहे काय? आमचे जे कर्मचारी

पीएमपीएमएलमध्ये काम करतात त्या कर्मचा-यासाठी अस्थापना आराखडा तयार केलेला आहे का? मा.आयुक्त साहेब, हा अस्थापना आराखडाच नसल्यामुळे पुण्यामध्ये पीएमटीच्या जागेमध्ये मुख्य कार्यालय आहे म्हणजे "ज्यांच्या हातात ससा तोच पारधी", मला म्हणायच आहे की त्यांचच त्याठिकाणी राज्य आहे. पीएमटीच्या अधिका-याना जेवढयाना प्रमोशन मीळालेले आहे त्याप्रमाणात पीसीएमटीचे पीएमपीएमएलमध्ये विलीन होताना जे  कर्मचारी गेलेले आहेत त्यामध्ये किती कर्मचा-यांचे प्रमोशन झाले? कोण आमचे अधिकारी तेथे प्रमोशनने बसलेले आहेत, नाही. म्हणजे त्यांच्या काही अटी, पात्रता कमी आहेत असे म्हणतात. साहेब, आपल्याकडे सातवी पास झालेले एक सहा.आयुक्त होते म्हणजे त्यांना प्रमोशनने पद मिळाले होते, म्हणजे हा कर्मचा-याच्या बाबतीत दुजाभाव आहे. म्हणजे अधिकारी म्हणून तेथे जाऊच शकत नाहीत. दुसरे म्हणजे कर्मचा-याच्या बाबतीतही दुजाभाव आहे, मी या आगोदर हेच सांगीतलेल होत जे कर्मचारी कन्डक्टर, ड्रायव्हर, कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर आहेत त्यांची पाच ते साडेपाचची डयूटी असते म्हणून ते पहाटे तीन वाजता येथून निघतात आणि कसे तरी तेथे पाच, साडेपाच पर्यंत पोहचतात. त्यांना डयुटी, बस पहीजे म्हणून एवढया पाहाटे ते तेथे जातात काही लोक रात्रीच तेथे झोपतात पण त्यांना पाचची डयुटी मिळाली नाहीतर काय वाटत असेल साहेब. याचा विचार आपण करा कारण आऊटघटकेचे का होईना, आपण तेथे अध्यक्ष आहात. पण आपल्या कामाची तेथे छाप पडेल असं काम आपण कराल असं मला वाटतय. इतकी वर्षे झाली किती बस स्टॅाप आपण याठिकाणी बांधले आहेत. किती बसस्टॉप बांधणेसाठी आपण आवाहन केलेले आहे. तोही प्लॅन आपल्याकडे उपलब्ध नाही कारण पिंपरी चिंचवड मध्ये अंदाजे २५० ते ३०० कि.मी.चे रस्ते आसतील, किती रुटवर, किती कि.मी. वर आपण बसेस चालवतो. पिंपरी चिंचवडच्या स्थलांतरीत लोकसंख्येचा जो रेट आहे तो सर्वात जास्त आहे हे आपल्यालाही माहीत आहे.  असं असताना, आपल्या वस्त्या, लोकसंख्या वाढत असताना अंतर्गत रुटवर बस का नाहीत. पुर्वीच्याच बसेस चालू आहेत, पुर्वीचेच रुट चालू आहेत तर मग आम्ही त्या पीएमपीएमएलमध्ये सामील होवून आमचा उपयोग काय? जे रुट आहेत तेच रुट चालू आहेत. आम्हांला फायदा नाही आम्ही तुम्हांला पैसे देतोत कारण  तुम्ही शासनाकडून आलेला आहात. आम्हांला माहीती आहे काय परस्थिती आहे तुमची. जिथं नियम नाही सर्व कारभार चौपट झालेला आहे ते सर्व याठिकाणी दिसतयं आणि मग शासनाकडे आम्ही मदत करावी म्हणून तुम्ही मागणी करतायं.  त्यांनी त्याठिकाणी ठराव केला की वेगळी पीएमटी राहू दया म्हणून. आम्हांलाही आमचं जे आहे ते आमचच आहे, आम्हीही काही कमी नाहीत.  मला तीथल्या सभागृहाला हे सांगायच आहे की जरी पीसीएमटी वेगळी केली तरी आम्ही ती समर्थपणे चालवू. आमचे अंतर्गत रस्ते तरी चालू होतील आणि गोरगरीब जनतेलातरी आम्हांला ही सेवा व्यवस्थीत देता येईल. आमचे रुट वाढवीले नाहीतर, आपली पीएमपीएमएल याठिकाणी नाही चालवलीतरी चालेल, आम्ही ते बंद करणार आहोत. स्वारगेट ऑफीस समोर कर्मचा-यांचे काही पदाधिकारी उपोषणाला बसलेले आहेत. आष्टेकर साहेब आपण सभागृहासमोर हे स्पष्ट करायच आहे की ते उपोषणाला का बसलेले आहेत आणि त्यांच्या मागण्या आपण मान्य करणार आहोत का?  व त्या करण्यासरख्या आहेत का? याच स्पष्टीकरण दयायला पाहीजे. आमचे काही प्रश्न आहेत, साहेब, आपल्यासाठी हा प्रश्न आहे, काही लोकानी व्हीआरएस घेतले त्यावेळेस काही चेक दिले गेले त्यामध्ये आपण इन्कम टॅक्स कपात करुन घेतला आणि त्या

इन्कम टॅक्सचे रिटर्न अजूनही दिले गेलेले नाहीत. रिटर्न एक वर्षात मिळतात पण यांचे रिटर्न अजूनही आलेले नाहीत. याठिकाणी मला वाटते की अकौंट ऑफीसर श्री.मुळे साहेब सुध्दा आलेले आहेत त्यांनी हे पाहीले पाहीजे की अजून रिटर्न का आलेले नाहीत. हे सर्व प्रश्न आपल्या समोर आम्ही मांडतोत. पदोन्नतीचा सुध्दा विचार करायला पाहीजे. पीएमपीएमएलसाठी ज्या नवीन बसेस घेतलेल्या आहेत त्या चालू करण्यास काय हरकत आहे, कपडे सुध्दा सहा महीने, वर्षभर वापरले नाहीतर कुजतात हेतर लोखंडी पार्ट आहेत. ती मशीन चालवली नाहीतर त्यामध्ये प्रॉब्लेम येणार आहे. तरी या सगळया कारभाराकडे लक्ष दयाव आणखीन बरचस बोलायच होत परंतु बोललं तरी उपयोग होत नाही तरी आम्ही मांडलेल्या मुदयांची उत्तर दयावीत.

**मा.निलेश बारणे-** म.महापौर साहेब, पीएमपीएमएल म्हणजे काय हे अम्हांला समजलेले नाही. मला वाटत पीएमपीएमएल म्हणजे जोशी, आष्टेकर, भोकरे, माने या पाच जणात चाललेली कंपनी आहे बाकीचे सर्व नामधारी आहेत असं मला वाटते. आता म्हेत्रे साहेब यांनी सांगीतले प्रमाणे स्पेअरपार्ट चोरी, डीझेल चोरी या चोरी संदर्भात माने यांच्यावर आरोप झाले, राज्यशासनातर्फे चौकशी चालू आहे तीन वर्षे झालेतरी ते अधिकारी त्या पदावर आहेत, आपण का कारवाई त्यांचेवर करत नाहीत याचा खुलासा आष्टेकर साहेबांनी करावा. आपण महापालिकेकडे १३.५० कोटीची मागणी करता. अन्य जाहीरात कंपनीकडून आपल्याकडे १२ कोटीचे येणे आहे. यासंदर्भात आपण काही कारवाई केली का? का करत नाहीत, कारण की आपण अधिकारी यामध्ये भागीदार आहात. याची चौकशी आपण का करत नाहीत. आज ३०० ते ६०० बसेस का बंद आहेत. आता नवीन ५०० बस खरेदी करणार आहेत २०० बस पिंपरी चिंचवड महापालिकेनी आणि ३०० बस पुणे महापालिकेनी दयायच्या आहेत. ६०० बस का बंद आहेत याची चौकशी आपण आजपर्यंत केली का? कोथरुड डेपोला आणि हाडपसर डेपोला टायर पक्चरमुळे बसेस बसून होत्या आणि टायरच्या बसला सुविधा देवून यांनी चालू केल्या, का तर यांची भागीदारी आहे. हे थांबल पाहीजे ही पाच अधिका-याची कंपनी आहे असे मी म्हणेल. यांचेवर कारवाई करावी एवढच मी सांगतो.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पीएमपीएमएलचा विषय आपल्या समोर आला की असे म्हणावे लागेल ज्यावेळेला पैसे देण्याची वेळ येते व पीएमपीएमएलला पैसे स्विकरण्याची वेळ येते त्याचवेळेला आष्टेकर साहेबांचे दर्शन घडते. आयुक्त साहेब बदलल्या नंतर एकदाच आष्टेकर साहेब आलेले होते. आमचे नगरसेवक बंधु भगिनी आहेत त्यांनी अशाचप्रकारे विषय मांडले आणि नेहमीप्रमाणे पीएमपीएमएलचे मोजकेच अधिकारी उशिरा यायचे वेळेवर यायचेच नाही, मिटींग एक वाजता आहे, ते राजे आहेत, महाराजे आहेत सभा चालू झाल्यानंतर यायचे प्रत्येकवेळेला सभागृहाचा अपमान करतात यांना कोणी अधिकार दिलेला आहे. त्यांना सगळया रक्कमा पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका देते त्यातल्या ४० टक्के रक्कमा ज्या आहेत त्या जर आपण देत असूतर महापालिका सभेचा अवमान करण्याचा अधिकार यांना कोणी दिला? दिड महीन्यापुर्वी स्थायी समितीचे सदस्य, अति.आयुक्त, आयुक्त, अध्यक्ष यांची बैठक घेतली होती त्यावेळेला असे ठरले

येथून पुढे प्रत्येक स्थायी समिती सभेला यायचे. आपण उत्तर दयाव की, हे ठरल्यानंतर आपण या सभेला कधी आलात. येथे आता १४ कोटी देवून झालेले आहेत व विषय आता अवलोकनासाठी आलेला आहे. याठिकाणी नुसती बडबड करायची कधीच कार्यवाही होत नाही. प्रत्येक वेळेला दिवाळीला चार कोटी द्यावे, पंधरा कोटी दयावे असे विषय या सभागृहासमोर येतात आणि आम्ही आमच्या सामान्य करदात्या नागरीकांची गरज म्हणून आम्ही सर्वजण ती रक्कम इच्छा नसून देतोत कारण आमच्या नागरीकांचे हाल होवू नयेत या भावनेतून. मा.महापौर साहेब, आपण त्या कमिटी मध्ये आहात असे असताना या घटना पुन्हा पुन्हा का घडतात. सांगीतलेल्या मुद्यावर कामकाज का केले जात नाही, त्याच्यावर सोल्युशन का शोधले जात नाही. का प्रत्येकानी प्रत्येकवेळेला मुद्दा मांडायचा, आमच्या ऐरीयामधील एखादया माणसाची याठिकाणी व्यथा मांडायची आणि पुन्हा एकदा पीएमपीएमएलने त्यांच्या पध्दतीनेच करायचे व पुणे, पिंपरी चिंचवड महापालिकेनी ज्या रक्कमा द्यायच्या त्या पध्दतीने दयायच्या. पुणे महापालिकेनी किती रक्कम दिली हे सांगावे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ज्या ज्या वेळेला त्यांना रक्कम पाहीजे त्या त्या वेळेला ती आपण देतोत ती फक्त नागरीकाबद्दल आपल्यामध्ये असणारे प्रेम, जिव्हाळा आणि आपूलकी यासाठी म्हणजे याचा अर्थ पिंपरी चिंचवड कडे खुप पैसे आहेत असा होत नाही. त्यांची जी दळणवळण यंत्रणा आहे ती कोलॅप्स होऊ नये, सुरळीत चालावी या भावनेतून आपण देतो. पिंपरी चिंचवड मधील कर्मचा-यांना प्रत्येक वेळेस वाईट वागणूक दिली जाते. आष्टेकर साहेबांना मी फोन करुन सांगीतलेले आहे की खाजगी कॉन्ट्रॅक्टरच्या बसेस घेतलेल्या आहेत त्यामध्ये अनेक त्रुटी असतात. एका गाडीमध्ये पंधरा सीट नाहीत असे त्या गाडीच्या बसनंबरसहीत आष्टेकर साहेबांना सांगीतलेले होते. पस्तीस सीट गाडीमध्ये असतील आणि एखदया गाडीमध्ये पंधरा सीट नसतीलतर तेथील कंट्रोलर गाडी कशी काय सोडतात. याठिकणी या सर्व लोकांची एकमेकांची पार्टनरशीप, भागीदारी वगैरे या गोष्टी असतात म्हणूनच चुकीच्या बसेस आपल्या रुटवर धावतात. पंधरा सीट नसताना बस धावतेच कशी? आम्ही आष्टेकर साहेबांना प्रत्येकवेळी गाडीच्या नंबरसह दिले, मोघम असं काहीच बोलत नाही. त्यानंतर एकदा ज्या बसेसमधून इतका धुर बाहेर येत होता त्या दोन बसेसचे नंबर सुध्दा दिले. आज पिंपरी चिंचवड शहरामध्ये प्रदुषणाच प्रमाण वाढलेल आहे अशा वेळेला पुढे पीएमपीएमएलची बसजर चालली तर मागच्या लोकांना दोन मिनीटे श्वास घेता येत नाही इतका धुर येतो व तो आम्हांला दिसतो परंतु यांच्या कोणत्याही अधिका-यांना तो दिसत नाही का? मग यांना कशाचा पगार दयायचा. एवढच नाहीतर यांच्या गाडया वेळेवर सुध्दा येत नाहीत. आष्टेकर साहेबांना एका गाडीचा नंबर सांगीतला होता, स्वारगेट डेपोवरुन बस सुटणार होती आणि सांगीतल की बस १०.४० वाजता आहे. तेथील लोकांना आपल्या कर्मचा-यानं सांगीतल बस १०.४० वाजता आहे आता तो येतोय त्याची आडचण आहे. येतो म्हणल्यानंतर तो कसा बसा १०.४० ऐवजी ११ वाजता आपल्या डेपोमध्ये हजर झाला. तो आल्यानंतर कंट्रोलरनी सांगीतल बस घे आणि पटकन जा लोक ताटकळत थांबलेत. १०.४० ची बस ११ वाजता निघणार या आपेक्षेन लोक बसली. आमचा कॅन्ट्रॅक्टरचा माणूस इतका हूशार होता त्यांनी ११.१० ला सांगीतल माझी तब्येत काही बरी नाहीय आता मी काही बस नेणार नाही. म्हणजे १०.४० पासून ११.१० पर्यंत आमचे नागरीक जे आहेत ते तेथे थांबले त्यांना कामावर जाण्यासाठी वेळ होतो, मुलांना कॉलेजस मध्ये जाण्यासाठी वेळ होतेय अशा सर्वाची तारांबळ

व्यवस्थितपणे यांचेकडून केली जाते. मग एवढी मोठी अमौंट आपण त्यांना का दयायची. कशासाठी आपण त्यांना या सगळया गोष्टी दयायच्या. सर्वात महत्वाच म्हणजे आपण पेपरमध्ये वाचतो या पीएमपीएमएल कधीच सुस्थितीमध्ये नसतात. जेंव्हा बघाव तेंव्हा त्यांचा कटोरा आमच्याकडे असतोच, की खुप आम्ही डबघाईला आलोय, खुप मोठी तूट आहे या तुटीचे कारण त्यांनी कधी शोधली आहेत का? सर्वात् महत्वाच म्हणजे त्यांच्या गाडया ज्या आहेत त्या कायम तीरक्या चालतात. तुमची, आमची गाडी कधी तीरकी चालताना पाहता का, नाही. आपण त्याची लगेच डागडूजी करतो, त्याच बॅलेन्सींग कमी जास्त झाल असेलतर आपण रिस्क व्हेरीफाय करतो सुस्थितीमध्ये गाडी करुन घेतो. परंतु याठिकाणी ती गरज वाटत नाही कारण टायर जाणार तर तो कोणाचा जाणार पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका याठिकाणी देणार आहे त्यामुळे टायर झीजलातरी यांच काही जाणार नाही त्यामुळे बस बीघडली म्हणायच आणि आपल्या सोईच्या पध्दतीने ती एखादया ठिकाणी लावून टाकायची आणि मग ही बसच खराब आहे अस म्हणायचं याच्या पेक्षा त्यांच्याकडे पर्याय नाही. म्हणजे आपण आजारी पडल्यानंतर, सर्दी झाल्यानंतर लगेच सर्दीच औषध घेतो तसं करत नाहीत कारण पुढच्या मोठया ऑपरेशनची वेळ पहायची आणि म्हणायच की आमची बस यंत्रणा जी आहे ती अत्यंत वाईट स्थितीला गेलेली आहे अत्यंत खराब झालेली आहे. एकदाच ठरवा की एकूण पीसीएमसीने किती मदत करायची हे एकदा फायनल कराव. याच्या पुढे त्यांनी डबघाईला यायच का पुर्ण बुडायच हे त्यांच त्यांनी ठरवाव. आपल्याकडे पीएमपीएमएलची जी काही मालमत्ता आहे, स्वारगेट स्टेशनला आहे, पुणे स्टेशनला आहे, हाडपसरला आहे, डेक्कनला आहे या सर्व मोक्यावरच्या ठिकाणी पीएमपीएमएलच्या मालमत्ता आहेत. त्याठिकाणी खाजगी ऑफीसेस चालतात विजय सेल्स सारख्याना ती जागा भाडयाने दिलेली आहे त्याच भाड आपल्याला येत नाही का? या सगळया गोष्टीची उत्तर दयावीत. नसता आम्ही बडबड करायची त्यांनी हो हो म्हणायच आणि यावर कोणतीही उपाययोजना करायची नाही. अनेक सदस्यांनी बसचा रुट मागीतला आहे. तो आमच्या नागरीकांची गरज म्हणून मागतो परंतु ते करता येते किंवा नाही हे दोन ओळीच पत्र पाठविण्याची तसदी सुध्दा आपण घेत नाहीत. एवढे कोटयावधी रुपये आपण देतो परंतु आपल्या एखदया पत्राचे उत्तर देण्याची तसदी सुध्दा त्यांना घ्यावीसी वाटत नाही. आमच्या १३३ सदस्यां पैकी दहा ते पंधरा सदस्य रुटची मागणी करतात. ते किती दिवसात करु शकतात किंवा करु शकत नाहीत याची कारण देणं त्यांना जरुरीचे वाटत नाही का? यापुढे त्यांना किती रक्कम दयायची याबद्दल आपण निर्णय घ्यावा. ठोस रक्कम आपण देणार आहोत एवढेच यापुढे सांगाव, त्यांनी त्यामध्ये एवढे रुट चालवावेत याचा आराखडा त्यांनी करु किंवा नाही करु आपण आपला आराखडा तयार करुन दयावा. अशी आपल्याला विनंती करते, धन्यवाद.

**मा.विनोद नढे**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पीसीएमटी व पुणे महानगरपालिकेची पीएमटी अशी पुर्वी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था होती. शासनाच्या धोरणानुसार इंडियन कंपनी ऍक्ट १९४९ अन्वये दि.१९.४.२००७ रोजी पीएमटी व पीसीएमटीचे विलीनिकरण होऊन पुणे महानगर परिवहन महामंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. पुर्वीच्या पीसीएमटीचे अंदाजे दिड हजार कर्मचारी नव्याने आस्तित्वात आलेल्या

पीएमपीएमएलमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत परंतु वाहतूक व्यवस्थेवर मोठया प्रमाणात ताण पडल्याने सतत तांत्रिक, प्रशासकीय व व्यवस्थापकीय अडचणीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीएमएल मोडकळीस आली असून सतत तोटयात आहे. तसेच पुणे महानगरपालिकेतील काही नगरसेवकांनी पीएमपीएमएल कंपनीच्या विभाजनाचा ठराव डिसेंबरमध्ये पारीत केला आहे. आणि तशाप्रकारचा प्रस्ताव सुध्दा त्यांनी शासनाकडे पाठविलेला आहे. आपण सुध्दा त्याच पध्दतीने ठराव करुन दाखवून दयावे. पिंपरी चिंचवड शहराची स्वतंत्र व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र ठराव करावा अशी विनंती आहे. पुणे महापालिकेनी असा ठराव केला त्या ठरावाबद्दल उलटसुलट चर्चा होत असून यामुळे पीएमपीएमएल मधील अधिकारी, कर्मचारी यांची मन:स्थिती द्विधा झालेली आहे. त्यातच सतत पिंपरी चिंचवड मनपा व पीसीएमटीचे कर्मचारी यांचा अवमान होत आहे. पीएमपीएमएलची स्थापना पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही शहरातील नागरीकांना उत्तम दर्जाची सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध होण्याच्या हेतूने स्थापित झालेली आहे. मुळात पीसीएमटी या पिंपरी चिंचवड मनपा वाहतूक संस्थाची आर्थीक व सांपत्तीक स्थिती ही पीएमटी या पुणे मनपाच्या वाहतूक संस्थेपेक्षा निश्चितच चांगली होती. पीएमटीची प्रवास वाहतूक गाडया, प्रवासी संख्या, कर्मचारी संख्या यांचे प्रमाण जास्त असून दिवसेंदिवस अनागोंदी कारभार व कर्जाचा डोंगर यामुळे त्यांची आवस्था पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे. या तुलनेत पिंपरी चिंचवड मनपा पीसीएमटीची आवस्था चांगली आहे. राजकीय व आर्थिक कारणास्तव दोन्ही पीएमटी व पीसीएमटी संस्थाचे झालेले विलीनीकरण आज दुर्दैवाने सर्व कर्मचा-यांचे खिलाडू वृत्तीने मनोमीलन एकत्रितपणे झालेले दिसत नाही. तसेच पीसीएमटी कर्मचा-यांना अपमानास्पद वागणूक दिली जात आहे. याचा विचार करता पीएमपीएमएल पासून पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था करावी अशी मी महापौर साहेब आपल्याला विनंती करतो. प्रामुख्याने पुणे, पीएमपीएमएलची नजर आपल्या निगडी, भोसरी याठिकाणी मोठे डेपो आहेत त्याच्यावर त्यांची नजर आहे आणि हे डेपो कसे हास्तगत करता येतील याची व्यूहरचना ते करतात. आष्टेकर साहेब आपल्याला मध्यंतरी फोन केला होता, काळेवाडी फाटयावर बस बंद पडलेली होती चार दिवस ती बस त्या ठिकाणी बंद होती. त्या बस मध्ये काही झोडपे बसलेले होते काही नागरीक त्याठिकाणी दारु पीत बसलेले होते. शेवटी मी दोन तीन मुलानां घेवून त्याठिकाणी बस मधील जे दारु पीत होते त्यांना, पोलीसाना बोलावल आणि पोलीसांच्या स्वाधीन केल. अशीजर आवस्था असेलतर निश्तिपणे ही जी काही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे ती मोडकळीस येईल. महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की आपण पुन्हा एकदा या स्वतंत्र वाहतूकीवर विचार करावा. धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आज याठिकाणी पीएमपीएमएलचा विषय आहे. महापौर आता म्हणाल्या की अवलोकनाचा विषय आहे त्यामुळे या विषयावर कितीही चर्चा केलीतरी ती निष्फळ आहे कारण आपण हे पैसे देवून बसलो आहोत. महापौर साहेब त्याठिकाणच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मुयरा शिंदे आहेत त्यांना याठिकाणी आपण बोलावलेले होते त्या याठिकाणी आलेल्या नाहीत त्यांचा मी जाहीर निषेध याठिकाणी करते. कालच्या वर्तमानपत्रामध्ये बातमी आली. पत्रकारानी असं विचारले एवढया

बसेस रुटवर बंद आहेत त्याचे कारण काय? तर त्याच कारण काय हे मला माहीती नाही, मला सांगता येणार नाही, असे बेजबाबदार वक्तव्य त्या मॅडमनी केले. त्यामुळे त्यांचा निषेध या सभागृहाच्या वतीने करणे हे क्रमप्राप्त आहे. मा.महापौर साहेब, कुठलाही नवीन अधिकारी ज्यावेळेला याठिकाणी येतो त्यावेळेला त्यांनी त्यांची माहीती देणेची याठिकाणी परंपरा आहे. या मॅडम नवीन आलेल्या आहेत. त्यांच्याकडे कोणकोणता चार्ज आहे, कोणकोणती जबाबदारी आहे किंवा कुठल काम त्या करणार आहेत त्याची माहीती आम्हांला नाही. महापौरांनी बोलावूनही त्या याठिकाणी आलेल्या नाहीत. आष्टेकर साहेब तुम्ही येवून काही फायदा नाही. कारण तुम्ही दरवेळेस येतात तेच ते रिपीट याठिकाणी करायच नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पीएमपीएमएलची स्थापना ज्यावेळेला झाली त्यावेळेला मारुती भापकर, आप्पा बारणे हे सभागृहात सदस्य म्हणून होते त्यावेळेला सगळयांनी आम्ही या पीएमपीएमएलच्या स्थापनेला विरोध केलेला आहे. जबरदस्तीने लावलेले हे लग्न आहे त्यामुळे ते पुढे चालण्याचा प्रश्नच येत नाही. दोन्ही महापालिकेमध्ये सत्ता असल्यामुळे तीकडच्या पदाधिका-यांनी ठरविले त्यांच्यावर वरच्या पालकमंञ्यांनी ठरविले की याठिकाणी ही कंपनी स्थापन करायची आणि ही कंपनी स्थापन करण्याची येथील सुध्दा काही पदाधिका-यांची इच्छा नसताना सुध्दा बळजबरीने ही कंपनी स्थापन करण्याचा घाट घातला गेला. त्याच्या मागची कारण यामध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी आमच्या महापालिकेचा एकही नाही, पुण्याचे एक आहेत बाकी सर्व शासन नियुक्त अधिकारी आहेत त्यांची जबाबदारी काय आहे. त्यांनी पीएमपीएमएलचा आराखडा तयार केला त्यासंदर्भात काय काय काम केले याची माहीती मिळालेली नाही. बरेचसे असे प्रश्न आहेत, सन्मा.सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले जात नाहीत. मा.आयुक्त साहेब सगळयांनी आता म्हणलं तुम्ही आता आध्यक्ष आहेत, तुम्ही आता अध्यक्ष आहेत, परंतु तुम्ही काय करणार आहेत हे मला माहीती आहे. नायक या पिक्चर मध्ये एक दिवसाचा मुख्यमंञी तस त्यांनी जे केले ते आपण करु शकणार का? याठिकाणी जोशी साहेब हे पीएमपीएमएलचे आध्यक्ष होते ते तात्पुरते आयुक्त म्हणून याठिकाणी आले होते ते म्हणत होते मी तात्पुरता आहे मला काही अधिकार नाहीत त्यामुळे मी कुठलेही फायनान्शीअल निर्णय घेवू शकत नाही मी कुठल्याही प्रकरणावर सही करणार नाही असं त्यांनी सभागृहामध्ये सांगीतल होत. मग तुम्ही काय करणार दुसरं, तसे तुम्ही सुध्दा तात्पुरते त्याठिकाणी आहात, त्यामुळे तुम्हांला सुध्दा सार्वभौम अधिकार काय आहेत याच्यावरती प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे आयुक्त साहेब असं म्हणण्यासाठी आपल्यावर ती जबाबदारी लोटतोय त्यामुळे तुम्हांला निश्चितपणे खरंच त्याठिकाणी काही अधिकार असतीलतर आता सभागृहात ज्या ज्या विषयावर चर्चा झालेली आहे त्या त्या विषयावर आपण एक महीन्यामध्ये हा मार्ग काढला पाहीजे. महापौर असतील, स्टॅण्डींग चेअरमन असतील कोणीही असेल त्याठिकाणी ऐकल जात नाही. आमच्या कडे घरकुल योजना सुरु केलेली आहे त्याठिकाणी सर्व शहरातील नागरीक राहतात तेथून त्यांना इतर ठिकाणी जाण्यासाठी शटलची व्यवस्था केली पाहीजे त्यांना कुठही जाण्यास मार्ग नाही. त्यांची मुल अजूनही पुर्वीच्याच शाळेत आहेत. दिलेल काम आपण पार पाडत नाहीत. आपली बीआरटीची लाईन अशी आहे की त्यामधुन एकच बस जाणार आणि आपली बस बंद पडण्याची संख्या बघीतलीतर व त्यामध्ये बस बंद पडलीतर क्रेन आणून उचलल्या शिवाय दुसरा कुठलाही पर्याय असणार नाही. अशाप्रकारची काम आहेत, सभागृह ओरडतय,

आपण ऐकतोत परत अधिकारी बदलतात सगळे बदलून जातात. निवडून येणारे असतात, जुन्या लोकांना माहीती असतं परंतु उपयोग काय. मा.आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे आता जे जे सांगीतलेल आहे आणि मागचे प्रोसीडींग काढावे त्यामध्ये ज्या ज्या गोष्टी आहेत आणि ज्यांच रिपीटेशन झालेल आहे त्याच्याकडे आपण लक्ष दिले पाहीजे. आणि बीआरटी येथे चालणार असे वाटत नाही अशी आम्हांला शाश्वती आहे. ते अजीबात येथे चालणार नाही, ते आम्हांला बुलडोझर लावून काढावे लागेल. अशामध्ये ही बीआरटी आपल्याला चालण्याची शाश्वती असेल तर संपुर्ण शहरामधील शटलबस सेवा त्यामधुन गेली पाहीजे जेणेकरुन रस्त्याचे ट्रॅफीक कमी होईल अशी सूचना मी याठिकाणी करते, धन्यवाद.

**मा.झामाबाई बारणे-** मा.महापौर साहेब, अधिकारी वर्ग. या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे. आताच सुलभाताईनी सांगीतलेल आहे पीएमपीएमएलला मदत केलेली आहे परंतु ज्या ज्या परीसरामध्ये काही अडचणी आहेत त्या सांगीतलेल्या आहेत. प्रत्येकानी आपआपल्या वॉर्डाबद्दल सांगीतलेल आहे. मी सुध्दा दोन वर्ष झाले पत्र दिले आहे. त्याच उत्तर त्यांना ज्या प्रमाणे आल त्याप्रमाणेच मलाही आलेल आहे. आपल्या भागामध्ये भरणा होणार नाही अस पत्र आलेल आहे. जर गाडीच गेली नाहीतर भरणा कुठून होणार आहे लोक आपोआपच गाडीमध्ये येवून बसणार का. एक-दिड कि.मी.अंतरावर लोकांना गाडी पकडायला चालत जाव लागत. थेरगांव फाटयाला, १६ नंबरला जायच म्हणलतर एक कि.मी.अंतरावर जायला लागतयं. गोरगरीब लोक, अंध, अपंग असतीलतर त्यांनी कसकाय जायचं. कारण रस्ते मोठमोठे आहेत २४-२४ मीटरचे रस्ते आहेत. ज्या सुखसोई गोरगरीबांना पाहीजे त्या आपण देत नाहीतर मग आपण हे पैसे कशासाठी द्यायचे, काय कारण आहे आणि का दिले. याच पहील्यांदा उत्तर दयायला पाहीजे कारण दोन वेळा मी पत्र दिलेल होत त्याच उत्तर असंच आलेल आहे. मग आपल्या नागरीकांना जर सोईसुविधा मिळत नसतीलतर काय उपयोग आहे. आता परवा सहा सात दिवस झालेले असेल एका मुलीचा ऍक्सीडेंट झालेला आहे ती मुलगी बिर्ला हॉस्पिटल मध्ये आहे त्यांना आपण काही भरपाई देणार आहेत का? प्रत्येक वेळेस पत्र दिलेल आहे त्याच उत्तर असंच आलेल आहे त्याचा काय उपयोग आहे त्यावर निर्णय घेतला पाहीजे. थेरगावच्या चारही बाजूने लोकांना जावे लागते त्या परिसराचा आराखडा दिलेला आपल्याकडे पोहचलेला आहे. तरी याठिकाणच्या गाडया चालू कराव्यात.

**मा.अनिता तापकीर**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमच्या काळेवाडीतून वायसीएम हॉस्पिटलला जाण्यासाठी बसची व्यवस्था नाही. गरीब लोकांना २०० रुपये रिक्षासाठी दयावे लागतात. कॉलेजच्या मुलांना पुण्यामध्ये जायच म्हणलतरी सुध्दा बससेवा नाही. मी मागे सुध्दा सभागृहास हे सांगीतल होत की आमच्याकडे बसची सेवा नाही. आम्ही दरवेळेस ओरडतो तरी अधिका-यांना काही वाटत नाही ते म्हणतात तुम्ही ओरडा आम्ही ऐकण्यासाठी भक्कम आहोत. गोरगरीब लोकांना रिक्षाने जाणे परवडत नाही. तरी बसव्यवस्था करावी.

**मा.सुनिता वाघेरे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी गावातून दोन तीन देहू-आळंदीच्या बस बंद केलेल्या आहेत. कोणत्याही नगरसेवकांना सूचना न देता, पत्रव्यवहार न

करता त्यांनी बस बंद केलेल्या आहेत. देहू-आळंदीहून मुल शिक्षणासाठी नवमहाराष्ट्र महाविद्यालयामध्ये येतात. आम्ही वारंवार विचारना केलीतर ते म्हणतात बस चालू करु परंतु अजून चालू केलेली नाही. ज्येष्ठ नागरीक सुध्दा भेटलेले आहेत, पत्रव्यवहार केलेला आहे. तरी आपण त्या बसेस चालू कराव्यात.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पत्रकार आणि अधिकारी वर्ग आता डबल एक दोनतरी शब्द होतील. पीएमपीएमएल आणि पहीले आपण रक्कम दिलेली आहे हे एक दोन तरी शब्द डबल होणारच. मलाही वाटल आता ज्येष्ठ सर्व नगरसेवक बोलले आहेत आपण काही बोलण्यात अर्थ नाही परंतु विषयाचे गांभीर्य समजण्यासाठी सगळयांनी बोलावे. आपली सार्वजनीक वाहतूक व्यवस्थीत असेलतर आपल्या रोडवर एवढा लोड येणार नाही. आणि आष्टेकरांना मला वाटत पुढची खुर्ची तरी दयावी म्हणजे मीटींग होईपर्यंत तरी त्यांच दर्शन होईल. विना सहकार नाही उद्दार, पण इथंतर आपला उद्दारच दिसतो. आपण एवढे अधिक पैसे देवून एवढा त्रास का भोगतोय हेच मला समजत नाही. महापौर आपण या कमिटीवर आहात. आपण सिरीअसली लक्ष घालून विषय पुढे न्यावा. पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना त्रास सहन करावा लागतो याचा विचार करावा.धन्यवाद, जय महाराष्ट्र.

**मा.विलास नांदगूडे** – मा.महापौर साहेब, पीएमपीएमएलचा जन्म कसा झाला, त्यावेळेला अशी चर्चा झाली लोकप्रतिनिधी व्यवस्थीत कारभार करत नाहीत म्हणून दोन्ही बॉडया डिझॉल्व्ह करुन पीएमपीएमएल ही कंपनी त्यावेळेस स्थापन केली. मग लोकप्रतिनीधीनं चांगल काम केल नाही तर पीएमपीएमएलचा कारभार सुधारला का? अजीबात सुधारला नाही. लोकप्रतिनीधी ज्या चांगल्या पध्दतीने काम करत होते त्याच्या पेक्षाही खराब काम या कंपनीने केलेले आहे. आज तुम्ही पाहील असेल की नगरसेवकांचा याठिकाणी किती अपमान होतो. त्यांचे फोन उचलले जात नाहीत, नगरसेवकांनी जर एखाद पत्र दिलतर त्याला उत्तर दिल जात नाही. आज ही महापालीकेची सभा आहे, आयुक्त आहेत, महापौर आहेत, सर्व नगरसेवक याठिकाणी उपस्थित आहेत तरी पीएमपीएमएलचे अधिकारी उशिरा येतात हा सुध्दा आमचा अपमान आहे. संपुर्ण पैसे तुम्ही देवून टाकले, फक्त माहीतीसाठी याठिकाणी विषय आलेला आहे. वास्तविक पाहता आमच्याकडे काही अधिकार राहीलेले नाहीत. एवढया अपमानास्पद या गोष्टी नगरसेवकांच्या बाबतीत होतात, तर नागरीकांच्या बाबतीत किती होत असतील. वेळेवर बस नाही, बसथांबा व्यवस्थीत नाही, बीघडलेल्या बसेस त्याठिकाणी येतात, बस कधी स्वच्छ नाही. परवा ज्येष्ठ नागरीकांच्या सभेमध्ये एक विषय झाला, ज्येष्ठ नागरीकांना त्याठिकाणी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावल होत. एका ज्येष्ठ नागरीकांनी अशी हाकीगत सांगीतली की पिंपळेनिलख पासून तो डेक्कनला चालला होता, त्या बसमध्ये तो रक्षक सोसायटीच्या तेथे चढला, बसमध्ये चढल्यानंतर त्यांन पाहीलतर फक्त पुढ आणि मागच सीट होते मध्ये सीटच बसायला नाही, तर तो म्हणाला सीट कुठे गेले, बसायला सीटच नाहीत तर तो कंडाक्टर म्हणाला, बस्स खाली ही मेट्रो आहे. किती आपमानास्पद वागणूक दयायची. म्हणून आयुक्त साहेब तुमच्याकडे अधिकार आहेत आपण यामध्ये लक्ष घालावं. पिंपरी चिंचवडचे नगरसेवक, नागरीक अतीशय तळमळीने याठिकाणी प्रश्न मांडतात त्यांचे प्रश्न सुटले पाहीजेत अशी याठिकाणी मी विनंती करतो.

**मा.आर.एस.कुमार**- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएलचे ज्या ज्या वेळी ठराव आले त्या त्या वेळी प्रत्येक नगरसेवकांनी आपआपले विषय सभागृहासमोर मांडलेले आहेत. मा.आयुक्त साहेब, दत्ता साने यांनी सांगीतले आहे, त्यांनी पत्र दिले आहे. पीएमपीएमएल ही कंपनी रजिष्टर्ड झाली का? याची माहीती देवू शकत नाही. प्रत्येक वर्षी ऑडीट रिपोर्ट हा सदस्यांना दयायला पाहीजे. तुम्हांला आमच्याकडून पैसे पाहीजे पण तुमच्याकडे काय चालत हे आम्हांला माहीती नको का? म्हणून माझी विनंती आहे की प्रत्येक वर्षी या सभागृहाला ऑडीट स्टेटमेंट आपण दयायला पाहीजे. या सभागृहामध्ये एकही सभासद त्यांच्या सर्व्हिसेस बद्दल, रुट बद्दल समाधानी नाही, बस बद्दल समाधानी नाही, व्यवस्थीत उत्तर देत नाहीत, आमचे काम होत नाहीत. सगळयाच रुटमध्ये प्रॉफीट मिळणार नाही. ही जनसेवा आहे आणि जनसेवा असताना काही रुटमध्ये प्रॉफीट जास्त मिळणार नाही. ऍग्रीमेंट प्रमाणे पहीले तीन वर्षे पैसे दयायला पाहीजे होते, आज सात वर्षे झालेले आहे, किती वर्षे पैसे दयायचे. आपल्या सेवेबद्दल आम्ही समाधानी नाहीत असे अनेकांनी सांगीतलेले आहे. पीसीएमटी कर्मचा-यांना सावत्र आईची वागणूक दिली जाते. अनेक लोक रेग्युलर रिटायर्ड झालेले आहेत त्यांना ग्रॅज्युएटी, पीएफचे पैसे मिळाले नाहीत, पेन्श्न नाही. हे पैसे मिळाले पाहीजे, करोडो रुपये तुम्ही दोन्ही संस्थेकडून घेता हे पैसे कुठे जातात. या विषयावर कितीही बोललेतरी कमीच आहे, हे कुठेतरी आता सुधारायला पाहीजे. आताच उबाळेताईनी सांगीतले जबरदस्तीने लावलेले हे लग्न, असे सांगीतले आहे तसे असेलतर आपण घटस्फोट घेवू व आपण स्वतंत्रपणे ट्रान्सपोर्ट चालवू. आपण आपल्या नेत्यांना समजावून सांगू, तुम्ही पीएमपीएमएल ही कंपनी केली परंतु ही सेवा नागरीकांना मिळत नाही, नागरीकांचे समाधान होत नाही तरी लवकरात लवकर पीसीएमटी व पीएमटी वेगळे करा असे आपण आपल्या नेत्यांना सांगायला पाहीजे आणि लवकरात लवकर पीएमटी आणि पीसीएमटी वेगळे करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आष्टेकर साहेब आपल्याला काही बोलण्यात अर्थ आहे असे मला वाटत नाही. मुख्य कार्यकारी जे आहेत त्यांनी याठिकाणी यायला पाहीजे होते. महापौरांनी सांगून सुध्दा जर त्या सभागृहामध्ये आल्या नसतीलतर पिंपरी चिंचवड सुध्दा पुण्याच्या तोडीसतोड आहे हे लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. आम्ही कायम वारंवार बोलतोत हे ऐकण्यासाठी खरे अध्यक्ष याठिकाणी पाहीजेत, तसेच नवीन मॅडम सुध्दा नाहीत. पीएमपीएमएलच्या अध्यक्षांना सुध्दा येथे बोलावले पाहीजे. त्यांना याठिकाणी एकदा बोलवा ते फक्त पुण्यामध्ये काम करतात, पिंपरी चिंचवडचे नगरसेवक काय बोलतात हे प्रोसीडींग त्याठिकाणी घेवून जावे. आम्ही आजपर्यंत एवढे पैसे देत आलेलो आहोत, अक्षरश: आम्हांला कंटाळा आलेला आहे. त्याठिकाणी बागवे यांनी ठराव मांडला तो आम्हांला पाचव्या मिनीटाला कळाला की पुण्यामध्ये जी.बी.मध्ये ठराव मांडला आहे. आम्हांला ठराव करता येत नाही अशातला भाग नाही, आम्हांला सुध्दा येथे ठराव करता येतो. ज्यावेळेला ही कंपनी झाली त्यावेळेला हे व्यवस्थीत काम करण्याचे ठरले, हे काम व्यवस्थीत मार्गी लावले पाहीजे. कुठलाही बिझनेस असो, तो वडापाववाला सुध्दा बंगला बांधतो मग पीएमपीएमएल कशी काय घाटयात जाते. घाटा यायला त्यातून फुकट प्रवासी घेवून जातात का? प्रत्येक अधिका-यांनी

आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. नाहीतर तूमच्या कार्यशाळा लावाव्यात, आपला बिझनेस तोटयामध्ये का येतो  आपल्या कार्याची क्षमता नाही का?  पीएमपीएमएलच्या अधिका-यांची कार्यक्षमता नसेलतर पगार का घेता हे तपासून बघीतले पाहीजे. माणूस सहन करतो परंतु दुसरा समोरचा माणूस त्रास देतोच असं चाललेल आहे. आज पुण्यामध्ये टोटल किती कर्मचारी आहेत. आमच्या कडून ६०-४० च्या रेशोप्रमाणे, येथून मागेतर ५० टक्के प्रमाणे पैसे दिलेले आहेत. आज तुम्ही ६०-४० प्रमाणे पैसे घेणार असालतर आमच्या कर्मचा-याना काही ज्ञानच नाही का. आज कितीतरी असे कर्मचारी आहेत की त्यांच क्वॉलीफीकेशन नाही परंतु ते तिकीट चेकर आहेत मग आमच्याकडील लोकांना प्रमोशन दयायला नको का? जर साडेनऊ हजार कर्मचारी असतीलतर क्लास-१ अधिकारी आमचा फक्त एकच आहे. मग आमचे काही चिंचोके आहेत का? आम्ही पैसे दिल्यनंतर अधिकारी लोकांनी काम केली पाहीजेत, ते काम करत नाहीत आणि पगार मात्र वारेमाप घ्यायचा. तुमच्या गाडया कोणकोणत्या रुटवर किती किती पळतात, स्वत:च्या गाडयांबद्दल बोलते पीएमपीएमएलच्या गाडयांबद्दल नाही बोलत, सगळया अधिका-यांच्या गाडयाला जीपीएस बसवा, सगळया अधिका-यांची शेती, त्यांचे घर गावाकडचे लोकेशन्स हे सगळे मला माहीती आहे. त्यांच्या गाडया पीएमपीएमएलसाठी वापरल्या जातात का, कशासाठी वापरल्या जातात, त्याच्यावरचा पेट्रेलचा खर्च हा बघावा. ज्या लोकांनी मागे-पुढे केल्यानंतर त्यांचे क्वॉलीफीकेशन नसताना दिलेले प्रमोशन याची यादी करावी, माझ्याकडे नावासगट यादी आहे. तेथे जाहीरातीवर, तिकीटाचा, टायर रिमोटवर भ्रष्टाचार आहे. मगाशी माझे सहकारी बोलले असतील, मानेसाहेब त्यातील नाहीत परंतु मी सांगते एवढया कर्मचा-यामध्ये ते एकच अधिकारी आहेत पण त्यांना जाणुनबुजून त्रास दिला जातो. ९५०० कर्मचा-यामध्ये आमचा फक्त एकच क्लास-१ अधिकारी आहे बाकीचे कोणी लोक नाहीत का? आम्हांला ६०-४० च्या रेशोप्रमाणे  त्याठिकाणी प्रमोशन देत नाहीत. तुमचे सगळे क्वॉलीफाय लोक असतीलतर ते मला मान्य आहे पण तुमच्याकडील लोक क्वॉलीफाय कमी असतील आणि त्यांना जास्तचा पदभार दिलेला असेलतर आमच्याकडच्या लोकांना का दयायचा नाही. पिंपरी चिंचवडमध्ये पीएमपीएमएलच नाही, आयुक्त साहेब, पहील्यांदा यांना पिंपरी चिंचवडमध्ये ऑफीस करण्यासाठी त्यांना याठिकाणी जागा दयावी. ते आले की कुठेतरी माझ्या केबीनमध्ये, महापौरांच्या केबीनमध्ये येतात. १२८ नगरसेवकांना, कर्मचा-यांचे प्रश्न मांडायचे असतीलतर मनपा बिल्डींगमध्ये पीएमपीएमएलसाठी एक कार्यालय दयावे, आणि याची कार्यवाही या आठवडयामध्ये करावी. त्यांना समजले पाहीजे कर्मचा-यांचे काय प्रॉब्लेम आहेत. आज माझ्याकडे भीसे म्हणून माणूस आलेला होता वय वर्षे ५५ मागच्या महीन्यामध्ये  †क्सीडेंट झाला त्याच्या डोळयाच ऑपरेशन झाल आणि तो चिखली मधुन कोथ्रूड डेपोला रोज कामाला जाणार, तो कसा जाणार. तूमच्या शिफ्ट कशा असतात काही लोकांना तर पाहाटे ३ वाजता घरातून बाहेर पडावे लागते. काही लोकांनी विनंती केल्यानंतर सुध्दा तुम्ही बदली करत नाहीत. एकच रेशो ठेवावा पिंपरी चिंचवडमधील लोकांना पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये दयावे व पुण्यातील लोकांना पुणे हद्दीतच दया. कशाला आमची लोक लांब पळवायची. निगडीचा माणूस स्वारगेटला, हाडपसरला जाणार. पाहाटे ३ वाजता जायचे असेलतर १.३० ला त्याला बाहेर पडावे लागते तेव्हा तो हाडपसर गाठू शकतो म्हणजे त्याचे फॅमिली लाईफ डिस्टर्ब त्यामुळे पिंपरी चिंचवडचे कर्मचारी पिंपरी चिंचवडमध्ये असावे व पुण्याचे कर्मचारी पुण्यामध्ये असावे मा.महापौरांची

आकुर्डी रेल्वे स्टेशन ते भोसरी ही बस त्यांनी बंद केलेली आहे. भोसरीतून काही कामगार कामासाठी मुंबईला जातात, शिक्षणासाठी डी.वाय. पाटील कॉलेजला विदयार्थी भोसरी मधुन येतात. पाच बस चालू होत्या आता त्यातील दोन बस चालू असतात. त्यातली एक बस बंद असते एकच चालू राहते. यांना रिक्षावाल्यांकडून, आरटीओ कडून मिळतात का नाही हे मला माहीती नाही आणि मला त्या विषयावर जायच पण नाही, परंतु हे योग्य नाही. आम्हांला येथे बसरुट मिळाले पाहीजेत. तुम्ही चौकशी करा, भरणा झाला पाहीजे या मताशी आम्ही सुध्दा आहोत, लॉस झाला पाहीजे असे म्हणत नाही. कात्रज बस, वायसीएम, पुणे महापालिका बसेस चालू कराव्यात अशी मागणी असताना सुध्दा चालू केल्या जात नाहीत. पुण्यामध्ये मॅार्डनला, सिम्बायोसीसला आमच्या येथील विदयार्थी शिकायला जातात त्या लोकांना तुम्हांला बसेस देता येत नाहीत, परंतु आयुक्त साहेब आपण पैसे मागीतले की देतोत. बोनसचे पैसे मागीतले की देतोत, मागच्या वेळेस दिवाळीचा बोनस देताना मी स्वत: पुण्यामध्ये पीएमपीएमएलच्या डेपोला गेले होते सगळे कर्मचारी अक्षरश: दिवाळीच्या बोनससाठी वाट बघत होते. आपण मागीतले की एक मिनीटात पैसे देतो, पुणे मनपा पैसे देत नाही. पुणे महापालिकेकडे किती व्याज निघाले हे यांना बघायला लागेल. आमचे पैसे दिल्यानंतर त्यांचे बोनस होणार होते, पुणे मनपाने नंतर शेवटच्या क्षणी पैसे दिले. हे बरोबर नाही, आमच्या पैशाला व्याज नाही का. आमचे कर्मचारी २५०० असलेतरी त्याठिकाणी कर्मचा-यांनी व्हीआरएस घेतलेला आहे. माझ्या वॉर्डातील ७० कुटूंब पीएमपीएमएलमध्ये आहेत एक सुध्दा सुखी नाही. परिस्थिती फार वाईट आहे. अनुकंपा तत्वावरची तीच परिस्थिती आहे. कर्मचारी मेला, त्याची बायकोही मेली, त्यांची मुल उघडयावर आली त्यांचा संसार उघडयावर आला तरी लोकांना पैसे मिळत नाहीत. माणस मेलीतरी त्यांना पैसे देवू नका, मात्र आमच्याकडून घ्या. वैयक्तीक आष्टेकर साहेब यांना आम्ही बोलत नाहीत तर पीएमपीएमएलच्या खुर्चीवर बसलेल्या अधिका-यांना बोलतो. यांचे ऑडीट क्लिअर आहे का हे बघावे. आपल्या ऑडीटरनी याची दखल घ्यावी, हे पैसे कसे वापरतात त्याचे दाखले घ्यावेत. एमआयडीसी डेपोचे काम करण्यासाठी पत्र दिलेले आहे त्याचे उत्तर सुध्दा मिळत नाही. आपल्याला मान्यता घ्यायची असेलतर हे लोक अटी टाकतात, काय कारण आहे इमारती बांधण्यासाठी हे पैसे देतात का? बस चालवायला पैसे आपण देतो. इमारत बांधायला हे पैसे देणार आहेत का, की यांनी अटी शर्ती टाकायच्या, का यांनी प्लॉट घेतलेला आहे, प्लॉट घेण्यासाठी महापालिकेनी पैसे दिले आहेत बिल्डींग आपण बांधणार आहोत आणि मीजास पीएमपीएमएलची. तरी आयुक्त साहेब आपण यावर विचार करावा. ६०-४० रेशो प्रमाणे आमच्या कर्मचा-यांना प्रमोशन मिळाल पाहीजे. पुढच्या वेळेस असे अवलोकनाचे विषय आणू नका, आणल्यास तूमच्याकडून वसूली करण्यात यावी असा ठराव सुध्दा येथे आम्हांला करावा लागेल. आम्हांला पीएमपीएमएलला पैसे दयायचे नाहीत आणि आयुक्त साहेबांनी दिलेतर त्यांचेकडून ते वसुल करण्यात यावे. आमचा माणूस चुकलातरी त्याला पाठीशी घालू नका. टेल्कोने सुध्दा मान्य केलेले आहे आमच्याकडून बॉक्समध्ये चुकीचे गेलेले आहे म्हणून असं असताना त्या एक व्यक्तीला सारख टार्गेट केल जात, कारण की हा अधिकारी पिंपरी चिंचवडचा आहे म्हणून. तो एक माणूस बाहेर पडला की सर्व दुकान पुण्यावाल्यांना रीकामीच झाली आणि म्हणून त्या माणसाची काहीही चूक नसताना त्याला त्यामध्ये गोवल जात त्याला त्रास दिला जातो. आष्टेकर साहेब तुम्ही त्रास देत नाहीत हे मला माहीती आहे तुम्ही त्यांच्या बरोबर

आहेत. परंतु तुमच्याकडची जी चैन आहे त्यांच्यामार्फत या पिंपरी चिंचवडच्या एका माणसाला बाहेर काढल्याशिवाय पर्याय नाही म्हणून त्या माणसाला त्रास दिला जातो परंतु ६०-४० च्या रेशोप्रमाणे आम्हांला प्रमोशन मिळाले पाहीजेत. आमचे कर्मचारी सुध्दा तेथे मानाने जगले पाहीजेत. आम्हांला सुध्दा तेथे ४० टक्के प्रमोशन मिळाले पाहीजेत. येथून पुढे आम्हांला जो पर्यंत प्रमोशन देत नाहीत, आमच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत एकही रुपयाचा विषय याठिकाणी आणायचा नाही आणि जर विषय आणलातर आमच्याकडून त्या विषयाला मंजूरी मिळेल अशी अपेक्षा करु नका उलट असा ठराव करणार की ज्यांनी दिले, ज्यांची त्याच्यावर सही आहे त्यांच्या पगारातून, त्यांना मिळणा-या पुढच्या पैशातून वसुल करावेत असे मी सांगते. हा विषय अवलोकनार्थ आहे हा विषय मंजूर करावा.

**मा.महापौर-** सर्व नगरसेवकांनी त्यांच्या भावना, व्यथा, मागण्या मांडलेल्या आहेत त्या आष्टेकर साहेब आपण त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात, नवीन रुट आहेत ते मान्य केले पाहीजेत आणि दरवेळेस मिटींगला आपण बोलवतो ते येत नाहीत येथून पुढे मिटींगला त्यांनी यायलाच पाहीजेत, आणि आपण ऑफीस मागीतलेल आहे तेही लवकरात लवकर देण्याच काम या महीनाभरात केल पाहिजे आणि आपल्या हद्दीमधील कर्मचा-यांना आपल्या हद्दीमध्येच ठेवले पाहीजे आणि कर्मचा-यांचे प्रमोशन लवकरात लवकर केले पाहीजे. अवलोकनाचे विषय अगोदर पैसे देता नंतर विषय आणता येथून पुढे जोपर्यंत आपल्या मागण्या ज्या आहेत त्या मान्य होत नाहीत तोपर्यंत असे अवलोकनाचे विषय आणू नयेत.

**मा.प्रवीण अष्टीकर (पीएमपीएमएल)**- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. सर्व सन्माननीयांची जी काही पीएमपीएमएलला पत्र येतात त्याचे होकार्थी असो किंवा नकारार्थी असो उत्तर द्यायला पाहीजेत याबाबत मी स्वत: लक्ष घालीन जे काही सन्मानीयांचे पत्र येतील त्याला होकार्थी किंवा नकारार्थी जे काही उत्तर असेल ते मुदतीमध्ये देणेत येईल अशी मी खात्री देतो. पीएमपीएमएलच्या स्थापनेचा विषय निघाला पीएमपीएमएल ही १६ एप्रिल २००७ च्या शासन निर्णयाव्दारे स्थापन झालेली आहे. पुर्व पीएमटी व पीसीएमटी मिळून २००७ साली ही कंपनी स्थापन झालेली आहे. ही कंपनी †क्ट १९५६ खाली आरओसी यांच्याकडे रजिष्टर्ड झालेली आहे. याची प्रत सभागृहाला सादर करण्याची व्यवस्था करतो. बसस्टॅण्ड बद्दल विषय निघालेला होता. पुणे महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये त्याचे कार्यक्षेत्र थोडक्यात सांगतो, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, तीन कॅण्टोन्मेंट, तीन नगरपालिका आणि १२८ गाव एवढयांना सर्व्हिस दिली जाते. ही सेवा ६८ लाख लोकसंख्येसाठी देणेत येते व ४ हजार ६०० ठिकाणी बस चालते. यापैकी आजच्या स्थितीमध्ये १६५० ठिकाणी बसथांबे आहेत. पीएमपीएमएलबाबत काही सन्मा.सदस्यांनी परदेशी साहेबांच्या काळात पत्र दिलेले होते असे सांगीतले. त्या पत्राला अनुसरुन आम्हाला बराचसा मोठा रिस्पॉन्स मिळालेला आहे. जवळपास साडेदहा कोटी निधी सन्मा.आमदार, खासदार, नगरसेवक यांचे मार्फत आम्हांला मिळालेले आहेत. यामधुन ३४५ बसस्टॉप बांधण्याचे काम चालू आहे. १६५० ठिकाणी बस थांबे आहेत उर्वरीत ठिकाणी बसथांबे उभारण्याच्या दृष्टीने व्यवस्था करण्यात येत आहे. त्यामध्ये मा.खासदार, मा.आमदार, मा.नगरसेवक यांच्या निधीमधून

बसस्टॉप बांधण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे तसेच बीआरटीच्या माध्यमातून पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेकडून बसथांबे बांधून मिळतात. जाहीरातीच्या माध्यमातून बसथांबे बांधुन मिळण्यासाठी दोनवेळा जाहीरात देण्यात आलेली होती परंतु काही कारणामुळे त्याला प्रतीसाद मिळालेला नाही आता आम्ही त्यातील ज्या त्रुटी आहेत त्या पुर्ण करुन तीस-या वेळेस जाहीरात देतो ते कार्यवाहीमध्ये आहे. जून्या बस बाबत विषय निघालेला आहे. पीसीएमटी होती त्यावेळेसची बससंख्या २१२ होती आजची बस संख्या ४७८ आहे यात पुणे महानगरच्या बसेस आहेत. भाडेतत्वावर पुर्वीच्या बससंख्या २६२ होती ती आता ४७८ आहे. बसमार्ग आज ७५ आहेत पुर्वी ६० होते. पुर्वीचे उत्पन्न प्रती कि.मी. २२.४४ पै. होते आज ते ४४.३० पै.प्र.कि.मी. आहे. प्रती बस रोजचे उत्पन्न २०२६/- होते ते आज २६३८/- रुपये आहे. एकूण बस शेडयुल पुर्वी १७५ होते ते आता ३६६ आहे. त्याचबरोबर नवीन आलेल्या बसेस निगडी, भोसरी, पिंपरी या तीन डेपोमध्ये बस दिल्या पाहीजेत अशी तक्रार होती. नवीन बस महामंडळाकडे आलेल्या आहेत त्यापैकी निगडीला ५०, भोसरीला ३०, पिंपरीला २५ बस आलेल्या आहेत. ६६० बसेस पैकी ५०० बसेस आलेल्या आहेत व १६० बसेस येणार आहेत त्यामुळे निगडीला ५, भोसरीला ५ व पिंपरीला ६ अतिरीक्त बस देण्याचे नियोजन आहे. ब्रेकडावून बाबत विशेष लक्ष घालून तीन सेंटरचे आठरा सेंटर केलेले आहेत त्यामुळे ब्रेकडावूनचे प्रमाण कमी झालेले आहे यापुढेही ब्रेकडावुनचे प्रमाण कमी होण्यासाठी प्रयत्नशील आहोत. बस बंद पडल्यानंतर लवकरात लवकर दोन तासामध्ये ती बस हलविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहोत. वेळापत्रकाबाबत सांगतो की, ४६०० ठिकाणी बसथांबे आहेत, पाचशे ते सहाशे ठिकाणी अशा वेळापत्रकाची माहीती आहे. यासाठी जाहीरातीच्या माध्यमातून निवीदा फ्लोट केलेली होती, त्या दोन वेळेला फ्लोट केलेल्या आहेत त्यातून रिस्पॉन्स आला नाही, रिस्पॉन्स न येण्याची कारण शोधून काढून त्यातील त्रुटी काढून आता तीस-यावेळेला पुढच्या आठवडयात निवीदा काढत आहोत. ४६०० ठिकाणी बसथांबे आहेत त्याठिकाणी वेळापत्रक आणि बसथांबे यादृष्टीने कार्यवाही करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. अनुकंपा तत्वावरील भरती बाबत विचारले, त्याबद्दल सांगतो की २००७ पासून आतापर्यंत एकूण २१० प्रकरण निकाली काढलेले आहेत. पुणे महापालिकेचे १२२ व पुर्व पीसीएमटीचे १०४ असे २२६ अनुकंपाचे प्रकरण निकाली काढलेले आहेत. एकूण ७५ प्रकरण हे कागदपत्रा अभावी प्रलंबीत आहेत त्यामुळे आम्ही पुढे कार्यवाही करु शकत नव्हतो. त्यांना वैयक्तीक पत्र दिलेले आहेत, दोन दोन वेळेला पत्र देवून त्यांचेकडे कर्मचारी पाठवून बोलावून घेतलेले आहे एवढे करुनही ३० व्यक्तींचा संपर्क होवू शकत नाही. ४५ पैकी १५ व्यक्तींनी कागदपत्र पुर्ण केलेले आहेत त्याची स्क्रूटीनी चालू आहे. पुढच्या पंधरा दिवसात त्याची कार्यवाही पुर्ण करत आहोत. उर्वरीत ३० पैकी १८ अपात्र आहेत २२ जनांचे कागदपत्र अपुर्ण आहेत ते पुर्ण करण्याची तयारी महामंडळा मार्फत सुरु आहे. २००८ व २०१० चे जे काही महामंडळाचे शासन धोरणाप्रमाणे धोरण आहे त्याप्राणे करणार आहोत. अस्थापनाच्या बाबतीत सांगायचे झालेतर आपल्याकडे पुणे महानगर स्थापन झाल्यापासून एकत्रीत असा अस्थापना आराखडा नव्हता. २०१२ साली अस्थापना आराखडा तयार केला सीआयआरटीकडे सन्मा.बोर्डामार्फत सादर केला बोर्डने सीआरटीमार्फत तपासून घेण्याचे सांगीतले त्याप्रमाणे सीआरटीकडून २०१३ ला तो तपासून आला व जानेवारी २०१४ ला अस्थापना आराखडा अंतीम करुन मा.बोर्डाची त्याला मान्यता मिळालेली आहे. याबाबत पुढची कार्यवाही

हरकती व सूचना आहेत त्या कार्यवाहीमध्ये आहेत. त्यानंतर पुढच्या दोन महीन्यामध्ये आराखडा लागू होईल त्यानंतर पीएमपीएमएलचे दोन्ही कर्मचारी एकत्रीत असतील आणि या अस्थापना आराखडयाप्रमाणे त्यांना त्यांच्या सेवाजेष्ठतेप्रमाणे निश्चित पदोन्नत्या मिळतील पण त्याला आणखीन दोन महीने तरी लागतील. जोपर्यंत अस्थापना आराखडा पुर्ण होत नाही तोपर्यंत आपल्याला रोस्टर तपासून घेता येत नाही आणि रोस्टर तपासणी झाल्याशिवाय आपल्याला पदोन्नतीची पुढची कार्यवाही करता येत नाही. ऑपरेशनल लॉसेस बद्दल विषय निघालेला होता. सन २०१३-१४ चा महामंडळाचा जो ऑपरेशनल लॉस आहे तो १३१ कोटी ८८ लाख आहे. हा जो ऑपरेशनल लॉस आहे तो अस्थापना खर्च, इंधनामधील दरातील वाढ, स्पेअरपार्टमध्ये दरामधे झालेली वाढ आणि २०१३ पासून आम्ही भाडेवाढ केलेली नाही. ३६९ रुट महामंडळामार्फत चालवले जातात त्यापैकी फक्त ३५ रुट १ कि.मी. गाडी चालविण्यासाठी जो खर्च येतो त्यापेक्षा जास्त उत्पन्नमध्ये चालविले जातात परंतु उर्वरीत ३३४ रुट लॉस मध्ये आहेत. या चार पाच मुद्दामुळे प्रामुख्याने जो काही ऑपरेशनल लॉस आहे तो आलेला आहे. यामध्ये १३ जानेवारी २०१३ पासून डिझेलची वेल पॉलीसी केंद्रशासनाकडून लागू झालेली होती तेव्हा पासून महामंडळाला जे डिझेल मिळणार त्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. १३ रुपये प्रती लीटरला फरक होता तो तसाच वाढत जातो आणि मार्च २०१३ पासून भाडेवाढ सुध्दा झालेली नाही. त्याचा एकत्रीत फरक हा लॉस वाढण्याला झालेला आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ३

दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/कप्र/११७/२०१४

दिनांक २६/०३/२०१४

सौ.निर्मला विजयराव तापकिर यांनी पिं.चि.मनपा निवडणुक २०१२ मध्ये निवडुन आलेल्या सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री. नितीन प्रताप काळजे यांचे अनाधिकृत बांधकामाबाबत दि.२९/१२/२०१३ रोजी अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने त्यांनी सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री.नितीन प्रताप काळजे यांचे विरुद्ध मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. ३११७/२०१२ व ६२६५/२०१२ दाखल केल्या होत्या. त्यातील मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे संबंधीत अनाधिकृत बांधकामाबाबतचा निर्णय न्यायालयाच्या कार्यकक्षेत असलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०/१ (ड), ११ व १२ च्या तरतुदीच्या अनुषंगाने सौ.विनया प्रदीप तापकीर यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१२/२०१४ दि.१०/२/२०१४ व

श्री.नितीन प्रताप काळजे यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१४/२०१४ दि. १०/२/२०१४ नुसार अनधिकृत बांधकामाबाबत खुलासा मागविणेत आला होता.

सौ.विनया प्रदीप तापकीर यांनी दि.२४/२/२०१४ रोजी सादर केलेल्या खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे माझे सास-याचे असले तरी ते माझ्यावर अवलंबून नाही व मी अनाधिकृत बांधकाम केलेले नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड) च्या तरतुदी मला लागु होत नाही, असा खुलासा सादर केला आहे.

श्री.नितीन प्रताप काळजे यांनी आपले दि.२४/२/२०१४ रोजी आपले खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे ही माझे वडीलांचे मालकीची असून त्या मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. माझे वडील माझेवर कोणत्याही प्रकारे अवलंबीत नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड), ११ व १२ च्या तरतुदीनुसार माझे विरुद्ध कोणतीही कार्यवाही प्रस्तावित करु नये असा खुलासा सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांनी सादर केलेल्या खुलाशानुसार अनधिकृत बांधकामामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ११ व १२ मधील तरतुदी अन्वये सदस्यांचे अर्हतेबाबतचा प्रश्न निर्माण झाल्याने मा.न्यायाधिशांकडुन निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १२ मधील तरतुदी नुसार असा संदर्भ मा.न्यायालयाकडे करण्यासाठी मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.शकुंतला धराडे** – मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ४९४ विषय क्रमांक - ३
दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/कप्र/११७/२०१४
दिनांक २६/०३/२०१४

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४९५ विषय क्रमांक - ४
दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

**अ)** दिनांक २६/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक १२/०३/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४९६ विषय क्रमांक - ५
दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

**अ)** दिनांक ०५/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४९७ विषय क्रमांक - ६
दिनांक – ५/७/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

**अ)** दिनांक ०१/०१/२०१४ व १५/१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक १५/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/८००/१४
दिनांक – २३ /०९ /२०१४



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.